समाजाच्या विविध गटांना आधार देण्यासाठी दिव्या फाऊंडेशन राज्यभर कार्य करीत आहे. वरवंड येथील दिव्य-सेवा निवासी पुनर्वसन प्रकल्पात 26 मनोरुग्ण राहतात. कुटुंबीयांच्या प्रेमाला पारखे झालेल्या निराधारांची दिवाळी दिव्या फाऊंडेशन आनंदात करीत आहे. येथील लद्धड इंजिनिअरिंग कॉलेजमधील प्रा. गणेश देशमुख यांनी संजीवनी सेवाभावी ट्रस्टद्वारे सामाजिक, शैक्षणिक उपक्रम हाती घेतले आहे. एक चहा समाजासाठी अभियान असो की आणखी कोणता उपक्रम, वंचितांना मदत हा त्यांचा उद्देश असतो. दिव्य-सेवा पुनर्वसन निवासी प्रकल्पातील मनोरुग्ण व निराधारांना किराणा साहित्य, प्रकल्पातील प्लंबिंगचे काम व इतर साहित्यासाठी त्यांचा नेहमी पुढाकार असतो. त्यांनी प्रकल्पाला एक लाखाची मदत केल्याने प्रकल्पातील निराधारांची दिवाळी द्विगुणित झाली.

# बुलडाणा-खामगाव

## अवतीभवती



बुलडाणा : पुरस्कार वितरण प्रसंगी उपस्थित मान्यवर.

## प्रा.देशमुख यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार

बुलडाणा, ता. २४ : येथील युनिक अॅकॅडमी ऑफ फाउंडेशनचे संचालक तथा पंकज लध्दड अभियांत्रिकी महाविद्यालयातील वरिष्ठ प्रा.गणेशराव देशमुख यांना नुकतेच राज्यसभा खासदार तथा माजी राज्यमंत्री डॉ.फौजीया खान यांच्या हस्ते औरंगाबाद येथे राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. राज्यभरात विविध विषयांवर प्रेरणादायी व्याख्याने या माध्यमातून प्रा.देशमुख यांनी कृतिशील उपक्रमातून राज्यपातळीवर शिक्षण क्षेत्रात क्रांती घडविण्याचे कार्य केले आहे. याव्यतिरिक्त संजीवनी सेवाभावी ट्रस्टची स्थापना करून निराधार, गरजू लोकांना १२ लाख रुपयांपेक्षा जास्त आर्थिक मदत केलेली आहे. सदर पुरस्कार ते त्यांचे आजी माजी विद्यार्थी व संजीवनी ट्रस्टच्या देणगीदारांना समर्पित करतो, अशी भावना यावेळी बोलताना त्यांनी व्यक्त केली.

# देशमुख यांना लोकरत्न पुरस्कार

बुलडाणा : वक्ते तथा लेखक प्रा. गणेश देशमुख यांना लोकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रा.गणेश देशमुख यांनी विविध विषयावर लिखाण केले आहे. तसेच व्याख्यानातून ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असतात. विद्यार्थ्यांना देशसेवेचे धडे देण्याचे काम ते आपल्या व्याख्यानाद्वारे करतात. औरंगाबाद येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्याला लेखक अरविंद जगताप,



अप्पर आयुक्त शिवानंद टाकसाळे जेष्ठ साहित्यिक आर. आर. बोराडे, सहकार आयुक्त डॉ.सुभाष माने, सामाजिक कार्यकर्त्या प्रीती मेनन शर्मा आदी मान्यवर उपस्थित होते.

# बुलडाणा जिल्हा एन.एस.यु.आय.तर्फे आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण



बुलडाणा,(दै.आम्हीचिखलीकर): बुलडाणा जिल्हा एन.एस.यु.आय. चे जिल्हा अध्यक्ष शैलेश खेडकर यांच्या संकल्पनेतून बुलडाणा जिल्हयात विविध ठिकाणी कार्यरत तसेच शैक्षणिक क्षेत्रात अतुलनिय कार्य करीत असलेल्या शिक्षकांना ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून बुलडाणा जिल्हयातील खालील शिक्षक-शिक्षिकांना आदर्श शिक्षण पुरस्कार वितरीत करण्यात आले. १.डॉ.सौ.मंजुश्री हर्षानंद खोबागडे, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सुंदरखेड, २. प्रा.डॉ. नितिन रामप्रसाद जाधव, राजे छत्रपती महाविद्यालय बुलडाणा, ३.प्राध्यापक गणेश पुंजाजी देशमुख (लेखक व प्रेरणादायी वक्ते) लध्दड इंजिनिअरींग कॉलेज येळगांव बुलडाणा, ४. प्रा.गोपालसिंह, गुलाबसिंह राजपूत (हरणखेडकर) जिजाऊ ज्ञान मंदिर पळसखेड भट, ५. प्राचार्या ज्योती श्रीकृष्णा पाटील तोमाई इंग्लिश स्कूल जांभरूण बुलडाणा, ६. प्राध्यापक अनिल भगवानराव शिंदे कुसुमावती भिमराव नॉलेज हब बोराखडी मोताळा ७.सौ.अजंली भगवान परांजपे, एडेड हायस्कूल बुलडाणा, ८.प्रा.संजय हेरंब देवल, भारत कनिष्ठ महाविद्यालय बुलडाणा. ९. प्राचार्य किशोर भगवान सिरसाट जिजाऊ ज्ञान मंदिर व ज्युनिअर कॉलेज पळसखेड भट १०. मुख्याध्यापक विष्णु हिरामण धंदर, जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळा दहिद बु. ११. गजेंद्रसिंग हरिदास राजपुत शिवाजी हायस्कुल, या आदर्श शिक्षक व शिक्षिकांचा गुणगौरव करत जिल्हा बुलडाणा एन.एस.यू.आय च्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला.

मदर तेरेसा नर्सिंग कॉलेज जांभरुण बुलडाणा येथिल हॉलमध्ये उपरोक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दैनिक देशोन्नतीचे उपसंपादक तथा विदर्भ पत्रकार संघाचे उपाध्यक्ष राजेंद्र काळे हे अध्यक्ष होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये संजय राठोड सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी, प्राचार्या सौ. मिनलताई आंबेकर, उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश महिला कॉंग्रेस कमिटी, पत्रकार लक्ष्मीकांत बगाडे शैलेश खेडकर अध्यक्ष बुलडाणा जिल्हा एन.एस.यु.आय, प्रदीप मोरे सरचिटणीस बुलडाणा जिल्हा एन.एस.यु.आय. श्रीभाऊ हगे म.प्र.युवक कॉंग्रेसचे सरचिटणीस, चित्रांगण खंडारे ज्येष्ठ कॉंग्रेस नेते, तुळशिराम नाईक माजी अध्यक्ष मोताळा तालुका कॉंग्रेस कमिटी तसेच मदर तेरेसा नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य, अरुण लोखंडे, प्रा.योगेश साळवे, सौरभ राठोड, सतिश आमाडे, आकाश राठोड, पुजा तायडे, पुजा पाजडे, अंकिता गवई, शुभांगी येरमुले व सयद मतीन, ऋषिकेश चव्हाण, ऋषिकेश शिंदे, आश्विनी कोळी, प्रज्ञा नाईक, रेणुका अंभोरे, विशाखा वाघ, समिक्षा जाधव, व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन वैभव पंढरी अंभोरे व रिया कन्हाळे यांनी संयुक्तरित्या केले. तर आभार प्रदर्शन कु.लक्ष्मी डोळसे हिने केले.

# आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण



**बुलडाणा, दि. ९ (प्रतिनिधी)**

बुलडाणा जिल्हा एन.एस.यु.आय.चे जिल्हा अध्यक्ष शैलेश खेडकर यांच्या संकल्पनेतून बुलडाणा जिल्ह्यात विविध ठिकाणी कार्यरत तसेच शैक्षणिक क्षेत्रात अतुलनिय कार्यरत असलेल्या शिक्षण-शिक्षिकेंना ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांना आदर्श शिक्षण पुरस्कार वितरीत करण्यात आले.

डॉ. मंजुश्री खोब्रागडे, प्रा. डॉ. नितिन जाधव, प्रा. गणेश देशमुख, प्रा. गुलाबसिंह राजपूत, प्राचार्या ज्योती पाटील, प्रा. अनिल शिंदे, अंजली परांजपे, प्रा. संजय देवल, प्राचार्य किशोर सिरसाट, मुख्याध्यापक विष्णु धंदर, गजेंद्रसिंग राजपुत आदी शिक्षकांना गुणगौरव करत हा पुरस्कार वितरण करण्यात आले. मदर तेरेसा नर्सिंग कॉलेजमध्ये सदर कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार राजेंद्र काळे तर प्रमुख उपस्थितीत प्राचार्या मिनल आंबेकर, पत्रकार धनाडे, शैलेश खेडकर, प्रदीप मोरे, दवे, चित्रांगण खंडारे, कुळशिराम नाईक, अरुण लोखंडे, प्रा. योगेश साळवे, सौरभ राठोड, वैद्दे, सतिश आजादे, आकाश राठोड, पुजा तायडे, पुजा पाजडे, अंकिता गवई, शुभांगी येरमुले व सय्यद मतीन, ऋषिकेश चव्हाण, ऋषिकेश शिंदे, आश्विनी कोळी, प्रज्ञा नाईक, रेणुका अंभारे, विशाखा वाघ, समिक्षा जाधव ह्या होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वैभव अंभोरे व रिया कन्हाळे यांनी तर आभार प्रदर्शन लक्ष्मी डोळसे हिने केले.

# महाराष्ट्रातील लोकरत्नामध्ये प्रा.गणेश देशमुख यांचा समावेश

◆ **बुलढाणा, ४ मार्च**

महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या लोकरत्न पुरस्कार देऊन पंकज लद्धड महाविद्यालयाचे प्रा. गणेश देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

हा पुरस्कार सोहळा अरविंद जगताप, शिवानंद टाकसाळे, आर. बोराडे, प्रिती मेमन इत्यादी मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह औरंगाबाद येथे नुकताच पार पडला.



पुरस्कार स्वीकारताना प्रा. गणेश देशमुख

यावेळी पंकज लद्धड महाविद्यालयाचे प्रा. गणेश देशमुख यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य लक्षात घेऊन त्यांची निवड समितीद्वारे करण्यात आली. प्रा. गणेश देशमुख त्यांचे लिखाण, व्याख्यान, पुस्तकातून विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा हेच सांगत नाही तर एक आदर्श नागरिक होऊन समाजाची देशाची सेवा कशी करावी हे त्यांनी सांगितले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

# लोकरत्न पुरस्काराने प्रा.देशमुख सन्मानित




प्रा.गणेश देशमुख यांचा सन्मान करतांना मान्यवर

***कार्यालय प्रतिनिधी/४ मार्च***

**बुलडाणा** : महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा नामांकीत लोकरत्न पुरस्कार देऊन औरंगाबाद येथे सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रेरणादायी वक्ते व लेखक बुलडाणा येथील पीएलआयटी कॉलेजचे प्रा.गणेश देशमुख यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य लक्षात घेऊन त्यांची निवड समितीव्दारे निवड करण्यात आली.

हा पुरस्कार प्रसिद्ध लेखक अरविंद जगताप, अप्पर आयुक्त शिवानंद टाकसाळे, आर. आर.बोराडे, डॉ.सुभाष माने, प्रीती मेनन शर्मा आदी मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण सभागृह औरंगाबाद येथे नुकताच पार पडला.

सकाळ

# लोकरत्नांमध्ये प्रा. गणेश देशमुख यांचा समावेश

**बुलडाणा, ता. २ :** महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा नामांकीत लोकरत्न पुरस्कार देऊन औरंगाबाद येथे सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रेरणादायी वक्ते व लेखक पीएलआयटी कॉलेज प्रा. गणेश देशमुख यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य लक्षात घेऊन त्यांची निवड समितीव्दारे निवड करण्यात आली.



**बुलडाणा : प्रा. गणेश देशमुख यांचा सत्कार करताना मान्यवर.**

प्रा. गणेश देशमुख यांच्या लिखाणातून, व्याख्यानातून, पुस्तकातून केवळ विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा हेच सांगता नाही तर एक आदर्श नागरिक होऊन समाजाची देशाची सेवा कशी करावी याचे अमुल्य मार्गदर्शनामुळे जीवनात दिशा मिळाल्याने पुरस्कारामध्ये समावेश करण्यात आला. हा पुरस्कार प्रसिद्ध लेखक अरविंद जगताप, अप्पर आयुक्त शिवानंद टाकसाळे, आर. आर. बोराडे, डॉ. सुभाष माने, प्रीती मेनन शर्मा, आदी मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण औरंगाबाद येथे नुकताच पार पडला. या पुरस्कारामुळे भविष्यात सामाजिक कार्य करण्यासाठी शंभर हत्तीचे बळ मला मिळाले. पुरस्कार मी माझ्या सर्व आजी, माजी, भावी विद्यार्थ्यांना समर्पित करतो अशी भावना प्रा. गणेश देशमुख यांनी व्यक्त केली.

Akola, Buldhana-Today
03/03/2019 Page No. 2

# नौकरी एक्सप्रेस च्या वतीने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या लोकरत्नांचा "लोकरत्न" पुरस्कार देऊन सन्मान





**मा.श्री.तुकाराम जाधव**
द युनिक अकॅडमी, पुणे
(महाराष्ट्र लोकरत्न)



मा.श्री.मुकुंदजी चिलवंत
जिल्हा माहिती अधिकारी, औरंगाबाद



मा.श्री.लक्ष्मण पांडुरंग ढाकरे
संचालक : युवा करिअर अकॅडमी, भगुर, जि. नाशिक



मा.श्री.प्रो.अनिलकुमार दुबे
संचालक : ऑफीसर्स करिअर अकॅडमी, पाचोली



मा.श्री.गोपाल दर्जी
दर्जी फाऊंडेशन जळगांव



मा.श्री.उद्धव इप्पर
संचालक : ज्ञानदीप अकॅडमी,अहमदपुर



मा.श्री.रविंद्र सरकार
संचालक : करिअर अकॅडमी, नाशिक



मा.श्री.अजय कांबळे
संचालक : युवा फिजिकल अकॅडमी, अकोला



मा.श्री.मधुदास घोरपडे
संचालक तथा माजी सैनिक श्री गुरु दत्त करिअर अकॅडमी, कोरेगाव जि.सातारा



मा.श्री.के.एस. राहाणे
संचालक : डिफेन्स करिअर अकॅडमी, औरंगाबाद



श्री.बाळासाहेब शिंदे
लेखक



मा.श्री.डॉ.गणेश देशमुख
लेखक : बुलढाणा



मा.श्री.राज भगवानराव आव्हाड
अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य विद्यार्थी कृती समिती



मा.श्री.डॉ.किरण जी. देसले
लेखक : जळगांव



मा.श्री.रंजन कोळंबे
लेखक तथा संचालक भगिरथ करिअर अकॅडमी



मा.श्री.डॉ.महादेव कोकाटे
इंग्रजी गुरु



मा.सौ.शितलताई सोमवंशी
संचालिका : सोमवंशी अकॅडमी, लोणीकंद, जि. पुणे



मा.श्री.श्रीराम कदम
माजी सैनिक
निसर्ग करिअर अकॅडमी,पुणे



मा.श्री.शंतनु सोनवणे
संचालक : परफेक्ट करिअर अकॅडमी, सिन्नर, जि. नाशिक



मा.श्री.बळीराम हवळे
लेखक : लक्षवेध चालु घडामोडी



मा.श्री.दिवेकर सोमनाथ सखाराम
संचालक : श्री एस. अकॅडमी, भूम



मा.श्री.डी.सी. शेळके
संचालक : साई स्वप्नपूर्ती अकॅडमी, औरंगाबाद



मा.श्री.महेश बडे
युवक सामाजिक कार्यकर्ते,पुणे



मा.श्री.लक्ष्मण सरले
उद्योजक, डोंगरवाडी, ता. पाटोदा, जि. बीड



मा.श्री.कांतीलाल पाटील
संचालक : इंग्लिश गुरु अकॅडमी, वाशिम.



मा.श्री.अजय चव्हाण
लेखक : औरंगाबाद



मा.श्री.मनोजकुमार गायकवाड
संचालक : गायकवाड कोचिंग क्लासेस, आष्टी ता. परतुर, जि. जालना

**दिनांक : २४ फेब्रुवारी २०१९**

**वेळ : दुपारी २ वाजता**

नौकरी एक्सप्रेसच्या वतीने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रामध्ये कामगिरी करणाऱ्या व सामाजिक बांधीलकी असणाऱ्या प्रतिनिधींना "नौकरी एक्सप्रेस-२०१९" ह्या पुरस्काराने सन्मानित करण्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील कार्यक्रमाकरीता नौकरी एक्सप्रेस संपादकीय व निवड समितीने महाराष्ट्रातील पुरस्कारास पात्र असलेल्या लोकरत्नांची निवड करून महाराष्ट्र राज्य लोकरत्न, विभागीय लोकरत्न, जिल्हा लोकरत्न, तालुका लोकरत्न, लेखक लोकरत्न, उद्योजक लोकरत्न, युवक लोकरत्न व मार्गदर्शक लोकरत्न इत्यादी पुरस्काराने महाराष्ट्रातील या लोकरत्नांना दिनांक २४ फेब्रुवारी २०१९ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद येथे सन्मानित करण्यात येणार आहे.

हा पुरस्कार देण्याकरीता 'चला हवा येऊ द्या' मधील प्रसिद्ध लेखक तथा कार्यक्रमाचे उद्घाटक अरविंदजी जगताप, कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक रा.रं. बोराडे, प्रमुख पाहुणे पोलीस उपायुक्त दिपाली घाटगे, अप्पर आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद शिवानंद टाकसाळे, औरंगाबाद मनपा आयुक्त निपुन विनायक, प्रसिद्ध लेखक स्पर्धा परीक्षा डोंबळा एकनाथ तात्या पाटील, माहिती संचालक औरंगाबाद यशवंत भंडारी, माजी सहकार आयुक्त डॉ. सुभाष माने, प्रकल्प अधिकारी आदिवासी विभाग औरंगाबाद गजानन फुंडे, सामाजिक कार्यकर्त्या प्रिती मेनन शर्मा, प्रसिद्ध लेखक बाळासाहेब शिंदे व निवेदक चांगदेव गिते यांच्या उपस्थितीत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन मेळावा व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या व भविष्यात करु इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यांना आय.एस. अधिकारी व प्रसिद्ध लेखक यांच्याशी या कार्यक्रमात थेट संवाद साधता येईल, अशी व्यवस्था नौकरी एक्सप्रेसच्या माध्यमातुन करण्यात आली आहे. या लेखकांपैकी तुकाराम जाधव, महादेव कोकाटे, गणेश देशमुख, बळीरामजी हवळे, बाळासाहेब शिंदे, रंजन कोळंबे, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंदजी चिलवंत, अजय चव्हाण, पोलीस निरीक्षक किशोर बोर्डे इत्यादी लेखकांशी युवकांना 'थेट संवाद' (प्रश्न विचारण्याची संधी) मिळणार आहे. तरी या महासोहळ्यास व मार्गदर्शन शिबिराचे साक्षीदार आपण व्हावे असे आवाहन संपादक सुग्रीव मुंडे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**स्थळ : यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, सन्मित्र कॉलनी, पैठण गेट, औरंगाबाद.**

The Printer, Owner & Publisher Munde Sugriv Sopanrao Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/02, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Aurangabad-431003 (M.H.) Published at P-30/0/02, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Aurangabad-431003. (Editor - Munde Sugriv Sopanrao) Office Ph. : 0240-2474813
हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक मुंडे सुग्रीव सोपानराव यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/०२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, औरंगाबाद - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/०२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, औरंगाबाद - ४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. संपादक-मुंडे सुग्रीव सोपानराव (मो. ९३७०१९९८१३) ऑफीस फोन : ०२४०-२४७४८१३ MAH/MAR/RNI/2010/34125
E-Mail : naukriexpress.impact@gmail.com Web.www.naukriexpress.in Postal Reg.No. G/RNP/AGD-415/2017-19

# प्रा.देशमूख यांना लोकरत्न पुरस्कार



बुलडाणा, २७ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी) : शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल साप्ताहिक नोकरी एक्स्प्रेसच्या वतीने बुलडाणा येथील पीए-लआयटी कॉलेजचे प्रा.गणेश देशमूख यांना नुकतेच औरंगाबाद येथे लोकरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. औरंगाबाद येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात प्रा.देशमूख यांना चला हवा येऊ द्या चे लेखक अरविंद जगताप, अप्पर आयुक्त शिवानंद टाकसाळे, जेष्ठ साहित्यीक आर.आर.बोराडे, डॉ.सुभाष माने, प्रीती शर्मा आदि मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# स्पर्धेला सामोरे जाताना वेळेचे नियोजन करावे - देशमुख

लोकमत न्यूज नेटवर्क

**शेलसूर :** विद्यार्थ्यांनी स्पर्धा परिक्षेची तयारी ही शालेय जिवनापासून सुरु करावी व स्पर्धेला सामोरे जाताना वेळेचे नियोजन करावे असे प्रतिपादन प्रख्यात वक्ते व पीएलआयटी बुलडाणाचे स्थापत्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.गणेश गायकवाड यांनी केले.

ते शेलसूर येथे श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ कला महाविद्यालयात आयोजित व्यक्तीमत्व विकास कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एस.ए.देशमुख हे होते. तर बी.ए. सोनुने, प्रा.व्ही.आर.घ्याळ, प्रा.पी.जी. खरात, प्रा.आर.वाय.जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी प्रा.देशमुख यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी अभ्यास कशा पद्धतीने करावा याचीही माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डी.एस. कापसे यांनी, प्रास्ताविक बी.ए.सोनुने यांनी केले तर आभार मानले.

(वार्ताहर)

लोकमत

# करिअर विषयक मार्गदर्शन शिबिर

**चिखली :** येथील युनिव्हर्सल इव्हेंट ऑर्गनायझर ग्रुपच्यावतीने १७ जून रोजी करिअर विषयक मार्गदर्शन व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सुप्रसिद्ध वक्ते व लेखक प्रा. गणेश देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

स्थानिक श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात इयत्ता दहावी व बारावीचे विद्यार्थी आणि पालकांसाठी आयोजित या शिबिरात प्रा. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील संधी, अभ्यास, वेळेचे नियोजन, स्वत:तील क्षमता ओळखून निवडावयाचे मार्ग तसेच आजची परीक्षा पद्धती, त्यातील चुका व त्यावर उपाय, स्पर्धा आदींबाबत सखोल मार्गदर्शन केले. या शिबिराचा सुमारे



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. गणेश देशमुख.

३०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. यशस्वीतेसाठी युनिव्हर्सलचे इव्हेंट ऑर्गनायझरचे सदस्य यश मंडोवरा, शुभम ढवळे, प्रतीक डहाके, राम जाधव, ऋषिकेश कुटाटे, सचिन चिंचोले, दीपक निकाळजे, महेश मापारी, मंगेश तांबोळी, योगेश चव्हाण, राहुल दांडगे, मनीष मुलचंदानी यांनी परिश्रम घेतले.

(तालुका प्रतिनिधी)

# विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करावे : सौ. पाटील

## करिअर मार्गदर्शन कार्यशाळा; राजर्षी शाहू मल्टिस्टेटचा उपक्रम

बुलडाणा, दि. २१ (प्रतिनिधी)

**आजच्या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी जिद्द आणि परिश्रमाची नितांत गरज आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागातील विद्यार्थ्यांमध्येही यश संपादीत करण्याचे सामर्थ्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आधी आपले ध्येय निश्चित करावे, असे आवाहन औरंगाबाद येथील पाटील कोचिंग क्लासेसच्या संचालिका सौ. सीमा पाटील यांनी केले.**

राजर्षी शाहू मल्टिस्टेट व पाटील कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी १५ एप्रिल रोजी इयत्ता ८ ते १२ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी स्थानिक सैनिक मंगल कार्यालयात मोफत करीअर व अभ्यासविषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सौ. पाटील बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या





अध्यक्षस्थानी राजर्षी शाहू परिवाराचे संस्थापक भाऊसाहेब शेळके होते. संस्थेचे अध्यक्ष संदीप शेळके, जि. प. सदस्या ॲड. जयश्रीताई शेळके, आर. आर. पाटील, उत्तमसिंग राजपूत, अनिल पाटील, गोपालसिंग राजपूत यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. सौ. पाटील यांनी नीट आणि जेईई या परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन केले.

तसेच परीक्षेसाठी लागणारी पुस्तके, अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या चुका याबाबतही त्यांनी विस्तृत माहिती दिली. त्यानंतर प्रा. गणेश देशमुख यांनी अभ्यास कसा करावा, वेळेचे नियोजन, घटक वाचण्यांचे महत्व, प्रवेश परीक्षेची तयारी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जि. प. सदस्या ॲड. जयश्रीताई शेळके यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

राजर्षी शाहू परिवाराच्या वतीने समाजातील विविध घटकांसाठी सातत्याने वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्याच अनुषंगाने देशाचे उद्याचे भविष्य असलेल्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, यापुढेही संस्था विद्यार्थ्यांसाठी असे उपक्रम राबविणार असल्याचे यावेळी संस्थाध्यक्ष संदीप शेळके यांनी सांगितले.

सूत्रसंचालन गोपाल पांढरे यांनी केले. या कार्यशाळेला विद्यार्थी व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांना मोफत करिअर मार्गदर्शन

**बुलडाणा, ता. २१ :** राजर्षी शाहू मल्टीस्टेट सोसायटी व पाटील कोचिंग क्लासेस औरंगाबाद यांच्या वतीने सैनिक मंगल कार्यालयात आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन करण्यात आले.

सर्वप्रथम क्लासेसच्या संचालिका सीमा पाटी यांनी एनईईटी आणि जेईई या परीक्षेसंबंधी सखोल मार्गदर्शन केले. या परीक्षेसाठी लागणारी पुस्तके, परीक्षेचा अभ्यासक्रम, काठिण्य पातळी, विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या चुका इत्यादी विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध



**बुलडाणा : मार्गदर्शन करताना प्रा. गणेश देशमुख.**

प्रेरणादायी वक्ते व लेखक प्रा. गणेश देशमुख यांनी अभ्यास कसा करावा, वेळेचे नियोजन, कठीण विषयांना रिवीजन, घटक चाचण्यांचे महत्त्व, प्रवेश परीक्षा पास करण्यासाठी लागणारी जिद्द, चिकाटी, मेहनत या सर्व गोष्टींसोबतच व्यक्तीमत्व विकासाचे उदाहरणासहित धडे दिले. सुमारे ५०० विद्यार्थी व पालकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष भाऊसाहेब शेळके, जयश्रीताई शेळके, संदीप शेळके, आर. आर. पाटील, उत्तमसिंग राजपूत, अनिल पाटील, गोपालसिंग राजपूत यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमातून आम्हाला खुप फायदा होणार असल्याचे मनोगत यावेळी विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

# सौ. पाटील यांचे नीट-जी वर तर प्रा. गणेश देशमुख यांचे व्यक्तीमत्व विकासवर मार्गदर्शन

**बुलडाणा, १७ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी) :** केवळ बुद्धीमत्ता असून उपयोग नाही, तिचा विनीयोग योग्य मार्गाने झाल्यासच यश संपादन करता येवू शकेल. म्हणून परिश्रमाची तयारी ठेवा, औपचारिकता म्हणून नव्हे तर ज्ञान अर्जीत करण्यासाठी अभ्यास करा, असे आवाहन पाटील कोचिंग क्लासेसच्या सौ. सीमा पाटील यांनी विद्यार्थ्यांना केले. प्रख्यात प्रेरणादायी वक्ते प्रा. गणेश देशमुख यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तीमत्व विकासाचे उदाहरणासहित धडे दिले.



राजर्षी शाहु मल्टीस्टेट सोसा. व पाटील कोचींग क्लासेस औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने ८ वी ते १२ विच्या विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्श करण्यात आले. सर्वप्रथम क्लासेसच्या संचालिका सौ.सीमा पाटील यांनी नीट/जी परीक्षेसंबंधी सखोल मार्गदर्शन केले. या परिक्षेसाठी लागणारी पुस्तके, परिक्षेचा अभ्यासक्रम, कठीण्यापातळी या सर्व विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध प्रेरणादायी वक्ते व लेखक प्रा. गणेश देशमुख (पी.एल.आय.टी बुलडाणा) यांनी अभ्यास करता करावा, वेळेचे नियोजन, कठीण विषयांची रिविजन, टेस्ट सिरीजचे महत्व प्रवेश परिक्षा पास करण्यासाठी लागणारी जिद्द, चिकाटी, सातत्य या गोष्टींवर सखोल मार्गदर्शन केले. सुमारे ५०० विद्यार्थी व पालकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष भाऊसाहेब शेळके म्हणुन लाभले होते. तसेच सौ.जयश्रीताई शेळके, संदिप शळके, आर.आर. पाटील, उत्तमसिंग राजपूत, पाटील, गोपालसिंग राजपूत यांनीही मार्गदर्शनपर भाषण केले.

दिनांक २५ फेब्रुवारी २०१७, शनिवार

गुड इव्हिनिंग City

# अभ्यास कसा करावा

विद्यार्थ्याने चांगले करीयर असेल तर आपली अभ्यासातून सुटका नाही हे सर्वप्रथम समजुन घ्यावे. विद्यार्थ्याने जिवनातील ध्येय मोठे ठेवावे त्यातुन इच्छाशक्ती निर्माण होते, इच्छा शक्तीतुन एकाग्रता वाढते, एकाग्रतेतुन अभ्यास करण्याची क्षमता वाढते. वेळचे काम वेळेवर करणे हाच कमी त्रासात जास्त अभ्यास करण्याचा मार्ग आहे. तुमच्या जवळील संपुर्ण वेळ वापरा. विद्यार्थ्याने सर्व विषय शाळेतच, महाविद्यालयातच शिक्षकांच्या तासिकेत लक्ष देऊन समजुन घ्यावेत म्हणजे घरी जास्त अभ्यास करावा लागत नाही. विद्यार्थ्याने एकुण उपलब्ध असलेला वेळ व एकुण करावयाचा अभ्यास याचे नियोजन करुन ते काटेकोरपणे पालन करावे.

शाळेच्या दिवशी कमीत-कमी ६ तास अभ्यास तर सुट्टयांमध्ये कमीत कमी १५ तास अभ्यास दररोज करावा. अभ्यासाला बसल्यावर सलग तीन तास तरी अभ्यास करावा मध्ये उठू नये. अभ्यासाची जागा शक्य असेल तर वारंवार बदलू नये. सकाळपासून रात्री झोपेपर्यंत प्रत्येक तासाचे नियोजन असावे. नियोजन शुन्य जीवन विद्यार्थ्याने जगू नये. विद्यार्थ्याने झोप फक्त रात्री ७ तास घ्यावी. स्वतःना समजेल अशा भाषेमध्ये स्वतःच्या नोट्स काढाव्यात. या नोट्स काढण्यासाठी तीन ते चार पुस्तकांचा प्रथम चांगला अभ्यास करावा. परिक्षेमध्ये हस्ताक्षर सुंदर काढावे, आकृत्या चांगल्या व मोठ्या काढाव्यात, खोडातोड टाळावी. सर्व विषयांची विभागणी दोन प्रकारात सोपे विषय आणि कठीण विषय. जे विषय तुम्हाला कठीण वाटतात त्यावर विशेष लक्ष देऊन त्याचा सराव करावा. सरावानेच कठीण विषय हे सोपे वाटतात. त्यांना जास्त वेळ द्यावा. स्वतःजवळील संपुर्ण वेळ व संपुर्ण ताकद अभ्यासात जर लावली तर परिक्षेत हमखास यश मिळतेच. अभ्यास जर चांगला झाला असेल तर परिक्षेची भिती मुळीच वाटत नाही त्यामुळे अभ्यासाला खुप वेळ द्यावा. परिक्षेचा अभ्यास करतांना त्या विषयाच्या कमीत कमी ५ मागील प्रश्नपत्रिका पाहाव्यात म्हणजे आपल्या अभ्यासाला योग्य दिशा मिळते. सरावाने आणि अभ्यासाने अतिशय साधारण विद्यार्थी सुद्धा परिक्षेत चांगले गुण मिळवू शकतो. आणि जीवनात प्रगती करु शकतो. अभ्यास न करणाऱ्या व दिवसभर टाईमपास करणाऱ्या मित्रांपासुन दूर रहा. डोळ्यासमोर कायम मोठे ध्येय असेल तरच विद्यार्थी यशस्वी होतात. मुळ उद्देशापासुन कधीच भटकू नका. अभ्यासाशिवाय पर्याय नाही. संतुलीत आहार घ्या. तब्येतीची काळजी घ्या. वेळेचे नियोजन व्यवस्थीत करा. अभ्यासा व्यतिरिक्त इतर सर्व विषय टाळा एकांतात रहा. आजच्या स्पर्धेच्या युगात एक जरी वर्ष वाया गेले तर तुमच्या क्षेत्रातील लाखो विद्यार्थी पुढे निघुन जातात त्यामुळे माणसाच्या जीवनात अतिशय महत्व आहे हे समजुन घ्या. यशस्वी झालेले सिनीयर मित्र यांच्या कायम संपर्कात रहा. त्याचं मार्गदर्शन घ्या. स्वतःच्या जीवनातील समस्या (घरातील वाद, आर्थिक समस्या, आजारपण) यांचा आपल्या अभ्यासावर जास्त परिणाम होणार नाही अशी मनःस्थिती बनवा. चांगल्या शिक्षकांचा आदर करा आणि त्यांच्या अनुभवाचा फायदा करुन घ्या. आई-वडील यांच्या आज्ञेचे पालन करा. ते तुमचे खरे शुभचिंतक आहे. परिक्षेत किंवा जीवनात कुठेही अपयश आले तर खचून जाऊ नका. आत्मविश्वास खुप वाढतो व पुन्हा त्या आत्मविश्वास पुढचे यश्या प्राप्त होते. ही यशाची मालिका आजच सुरु करा. सर्व महत्वाचे, सुत्र, आकृत्या, समीकरण याचा एक संच कायम तुमच्या जवळ ठेवा तो आयुष्यभर कामात येतो.



प्रा.गणेश देशमुख
पंकज लद्धड बुलडाणा, मो.नं. ९७३०८२२२३२

# लिंगाडे तंत्रनिकेतनमध्ये प्रा.देशमुख यांचे मार्गदर्शन संपन्न



**बुलडाणा, ३ मार्च, (गुड इव्हिनिंग सिटी)**: स्थानिक रामभाऊ लिंगाडे तंत्रनिकेतन महाविद्यालय येथील द्वितीय व अंतिम वर्षाच्या सर्व शाखेच्या विद्यार्थ्यांना स्थानिक पंकज लढ्ढड अभियांत्रिकी महाविद्यालय येथील प्रा.गणेश देशमुख यांनी प्रोत्साहनपर व्याख्यान दिले. यात त्यांनी अभ्यास कसा करावा, वेळेचे नियोजन कसे करावे व स्वत:मधील क्षमता ओळखुन जीवनात कसे यशस्वी व्हायचे यावर मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील तरुणांनी कुठल्याच प्रकारचा न्युनगंड न बाळगता व घरातील परिस्थीतीची संपुर्ण जाणीव ठेऊन जास्तीत जास्त अभ्यास करावा असे प्रा.देशमुख यांनी सांगितले. त्यानंतर आजची परिक्षा पद्धती, परिक्षेत विद्यार्थ्यांकडुन होणाऱ्या चुका, त्यावर उपाययोजना, प्रत्येक क्षेत्रातील वाढत असलेली स्पर्धा, युवा पिढीकडुन समाजाला असलेल्या अपेक्षा, ध्येय गाठण्यासाठी लागणारे अथक प्रयत्न या सर्व विषयांवर प्रकाश टाकला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.राजपुत, स्थापत्य विभागाच्या प्रमुख प्रा.मोडक, प्रा.हरणखेडकर, प्रा.जामोदे या सर्वांनी अथक प्रयत्न केले.

# पाटील कोचिंग क्लासेसतर्फे उद्या मोफत मार्गदर्शन



## मोटीव्हेशनल स्पिकर प्रा.गणेश देशमुख यांचे विशेष व्याख्यान

**बुलडाणा, १४ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : पाटील कोचिंग क्लासेस ओरंगाबाद व राजर्षी शाहु मल्टीस्टेट सोसायटी बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या रविवार १५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी करीअर तथा अभ्यासविषयक मोफत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून १० वी, १२ वी नंतर काय? या विषयावर क्लासेसच्या संचालिका सौ.सिमा पाटील ह्या मार्गदर्शन करणार आहेत. सद्या प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा खूप वाढली असून, नेमके काय करावे? या विषयी विद्यार्थी व पालक संभ्रमित असतात. या सर्व शंकाचे निरसन सौ.सिमा पाटील यांच्याकडून केल्या जाणार असून, त्यानंतर लध्दड कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्रा.गणेश देशमुख यांचे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्याख्यान होणार आहे. अभ्यास कसा करावा? वेळेचे नियोजन तथा कठीण विषयाची रिवीजन या विषयी त्यांचे सखोल मार्गदर्शन होईल. तरी ८ वी ते १२ वीचे विद्यार्थी व पालक यांनी या मार्गदर्शन शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन पाटील कोचिंग क्लासेस व राजर्षी शाहू सोसायटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पेस आयआयटी व मेडीकल यांच्या सेमिनारला विद्यार्थी व पालकांचा प्रचंड प्रतिसाद




***वाणिज्य प्रतिनिधी/*** *७ एप्रिल*

**बुलडाणा :-** भारतातील नामांकीत पेस आयआयटी ॲन्ड मेडीकल या संस्थेद्वारा इंजिनिअरींग व मेडीकल क्षेत्रात आपले करिअर करू इच्छिणाऱ्या व वर्ग १० वीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्थानिक गर्दे हॉल बुलडाणा येथे दि.६ एप्रिल रोजी घेण्यात आलेल्या करीअर विषयक आणि अभ्यास विषयक सेमिनारला संपुर्ण जिल्ह्यातून विद्यार्थी व पालकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमात सर्वप्रथम महाराष्ट्रातील सुप्रसिध्द वक्ते व लेखक प्रा.गणेश देशमुख (पीएसटीआय) बुलडाणा यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा, वेळेचे नियोजन इत्यादी विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यानंतर पेस इन्स्टिट्यूटचे बीटेक मध्ये आयआयटी असलेलो व फिजिक्स विषयाचा २४ वर्षाचा प्रदीर्घ अनुभव असलेले संदीप सिंघल आणि केमिकल मध्ये बीटेक व पेस आयआयटी मुंबई येथे फाऊन्डेशन बिल्डरचे हेड असलेले अनिकेत आखाडे या अनुभवी प्राध्यापकांनी एनईईटी, जेईई या परीक्षेसंबंधी सखोल मार्गदर्शन केले. तदनंतर अकोल्यातील मॅथस करीता सुप्रसिध्द प्रा.संतोष देशमुख यांनीही मार्गदर्शन केले.

या सेमिनारला सुमारे ४०० च्या वर विद्यार्थी पालकांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.संतोष व्ही.देशमुख सर, मन्नाटकर, सौ.घिरके, कु.तायडे, जाधव यांनी अथक प्रयत्न केले. एनईईटी, जेईई या परीक्षेची कठीण पातळी, पास होण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न, वेळेचे महत्व या सर्व गोष्टी आम्हाला समजल्या व या कार्यक्रमाचा खुप फायदा झाला असुन आता दिल्ली, मुंबई, कोटा, नागपूर, औरंगाबाद व पुणे अकोला, नांदेड येथे जाण्याची गरजच उरली नाही असे मनोगत विद्यार्थी व पालकांनी व्यक्त केलेत.

विशेष म्हणजे पेस आयआयटी व मेडीकल बुलडाणा सेंटर येथे इंजिनिअरींगकरीता आयआयटी जेईई साठी स्वतः आयआयटीएन्स फॅकल्टी शिकविणार आहे. तसेच येथे स्कॉलरशिप सुध्दा देण्यात येणार आहे. विद्यार्थी व पालकांच्या आग्रहास्तव दि. ८ एप्रिल रोजी एन्ट्रन्स एक्झाम घेण्यात येणार आहे. तरी विद्यार्थी व पालकांनी सेंटरला भेट देवुन आपली नोंद करावी. तसेच ७ ते १० विद्यार्थ्यांसाठी आयआयटी जेईई फाउन्डेशन बिल्डर बॅच साठी संपर्क करावा. मुंबई येथे मुख्यालय असणाऱ्या पेस ने बुलडाण्यात सर्कल रोड, महाजन झेरॉक्सजवळ, सरस्वतीनगर, बुलडाणा या ठिकाणी कोचिंग क्लासेसची अत्याधुनिक सोय उपलब्ध करून सेंटर उघडण्यात आली असून लवकरच १८ एप्रिल पासून बॅचेस सुरू होत आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी ९१५६७६६५२८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करून आपली नांव नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन पेस च्यावतीने करण्यात आले आहे.

# प्रा.देशमुखांनी दिला अमरावतीत 'अभ्यासमंत्र'



**बुलडाणा, १७ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** पी.एल.आय.टी कॉलेज बुलडाणाचे प्रा.गणेश देशमुख यांचा 'अभ्यासमंत्र' हा प्रेरणादायी कार्यक्रम नुकताच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती व राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय बडनेरा येथे पार पडला. सुमारे अनुक्रम १00 आणि २५0 विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा, वेळेचे नियोजन कसे करावे, स्पर्धा परिक्षेसाठी लागणारे प्रयत्न, शिक्षणानंतर उपलब्ध असणारे कोर्सेस, त्यातील मर्यादा व संधी, सराव परिक्षेचे महत्व अशा अनेक बाबींवर मार्गदर्शन केले. ही दोन्ही महाविद्यालये गुणवत्तेच्या आधारे संपुर्ण महाराष्ट्रात नावाजलेली आहेत. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे विभागप्रमुख व वरीष्ठ प्राध्यापक वृंद उपस्थित होते. या कार्यक्रमातून उत्स्फुर्त प्रतिसाद विद्यार्थ्यांकडून मिळाला.

# प्रा.देशमुख यांचे नाशिक येथे प्रोत्साहनपर व्याख्यान

*कार्यालय प्रतिनिधी/३ ऑगस्ट*

**बुलडाणा** : स्थानिक पंकज लध्दड अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा.गणेश देशमुख (Dean Administration) यांनी भारतातील सर्वात मोठा शैक्षणिक समूह असलेल्या संदीप फाऊंडेशन नाशिक येथे स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या ५०० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.





विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा.गणेश देशमुख

यावेळी प्रा.देशमुख यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यास का करावा, कसा करावा, वेळेचे नियोजन कसे करावे व स्वतःमधील क्षमता ओळखून जीवनात यशस्वी कसे व्हायचे ? यावर मार्गदर्शन केले.

आजची परीक्षा पध्दती, परिक्षेत विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या चुका व त्यावर उपाययोजना, प्रत्येक क्षेत्रात वाढत असलेली स्पर्धा, ध्येय गाठण्यासाठी लागणारे अथक प्रयत्न, चिकाटी, घरातील आर्थिक परिस्थितीची जाणीव या सर्व बाबींवर प्रकाश टाकला.

त्यानंतर शिक्षण झाल्यानंतर उपलब्ध असणारे कोर्सेस त्यांच्या पूर्व परीक्षा, मुलाखती याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी स्वतःजवळील प्रत्येक मिनीट वापरुन व स्वतःच्या भाषेत सर्व विषयाच्या नोटस् काढून जास्तीत जास्त अभ्यास करावा,

असे प्रा.देशमुखांनी यावेळी सांगितले. यावेळी विभागप्रमुख प्रा.बिडकर, प्रा.शंतनु पांडे व इतर सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते, असे एका पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

शहर RDx Read Daily Exclusive

बुलढाणा/सोमवार, दि.१८ सप्टेंबर २०१७ देशोन्नती

# प्रा.गणेश देशमुख यांचे राज्यस्तरावर व्याख्यान



विद्यार्थ्यां समवेत प्रा. गणेश देशमुख

***कार्यालय प्रतिनिधी/***१७ सप्टेंबर

**बुलडाणा** : स्थानिक व्हिजन बुलडाणा एज्युकेशनल ॲन्ड वेलफेअर सोसायटीद्वारा संचालीत पंकज लध्दड अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रशासकीय अधिष्टाता प्रा.गणेश देशमुख यांची मुंबई येथील भारतातील सर्वात जुने अभियांत्रिकी महाविद्यालय वीरमाता जिजाबाई टेक्नोलोजीकल इन्स्टिट्युट (वि.जे.टी.आय) येथे प्रेरणादायी वक्ता म्हणून निवड करण्यात आली व तेथे त्यांनी सुमारे १५० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

वि.जे.टी.आय.हे महाविद्यालय १३० वर्षे जुने असून शैक्षणिक गुणवत्तेच्या आधारे भारतात प्रथम क्रमांकावर आहे. कार्यक्रमाचे आयोजन वस्त्र निर्माण विभाग प्रमुख प्रा.प्रवीण देशमुख, प्रा.प्रियंका सपकाळ, प्रा.दिवटे यांनी केले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा तसेच वेळेचे नियोजन, स्पर्धा परिक्षा, मुलाखती, शासकीय व खाजगी क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या संधी व त्यासाठी लागणारी तयारी या सर्वांवर प्रकाश टाकला. त्यांच्या या शैक्षणिक उपक्रमाला संस्थेचे अध्यक्ष डॉ. दिपक लध्दड व प्राचार्य डॉ.प्रदीप जावंधिया यांनी शुभेच्छा दिल्या.

# प्रा. गणेश देशमुख यांचे व्याख्यान



**बुलडाणा : प्रा.देशमुख यांच्यासोबत उपस्थित असणारे विद्यार्थी.**

**बुलडाणा, ता. १७ :** पंकज लध्दड अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा. गणेश देशमुख यांनी मुंबई येथील अभियांत्रिकी महाविद्यालय वीरमाता जिजाबाई टेक्नोलॉजिकल इन्स्टिट्यूट येथे प्रेरणादायी वक्ता म्हणून निवड करण्यात आली व त्यांनी सुमारे १५० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

व्ही.जे. टी. आय हे महाविद्यालय शैक्षणिक गुणवत्तेच्या आधारे प्रथम क्रमांकाची संस्था म्हणून आहे. कार्यक्रमाचे आयोजन वस्त्र निर्माण विभाग प्रमुख प्रा. प्रवीण देशमुख, प्रा. प्रियांका सपकाळ, प्रा. दिवटे यांनी केले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा तसेच वेळेचे नियोजन, स्पर्धा परीक्षा, मुलाखती, शासकीय व खासगी क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या संधी व त्यासाठी लागणारी तयारी या सर्वांवर प्रकाश टाकला. त्यांच्या या शैक्षणिक उपक्रमाला संस्थेचे अध्यक्ष डॉ. दीपक लध्दड व प्राचार्य डॉ. प्रदीप जावंधिया यांनी कौतुक केले आहे.

# लध्दड अभियांत्रिकीचे प्रा.गणेश देशमुख यांचे राज्यस्तरावर व्याख्यान



**बुलढाणा, १५ सप्टेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** स्थानिक व्हिजन बुलढाणा एज्युकेशनल ॲन्ड वेलफेअर सोसायटी द्वारा संचालित पंकज लध्दड अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रशासकीय अधिष्टाता प्रा.गणेश देशमुख यांनी मुंबई येथील भारतातील सर्वात जुने अभियांत्रिकी महाविद्यालय वीरमाता जिजाबाई टेक्नोलॉजिकल इन्स्टिट्युट (वी.जे.टी.आय.) येथे प्रेरणादायी वक्ता म्हणून निवड करण्यात आली व त्यांनी सुमारे १५० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वी.जे.टी.आय. हे महाविद्यालय १३० वर्षे जुने असून शैक्षणिक गुणवत्तेच्या आधारे भारतात प्रथम क्रमांकावर आहे. कार्यक्रमाचे आयोजन वस्त्र निर्माण विभाग प्रमुख प्रा.प्रविण देशमुख, प्रा.प्रियंका सपकाळ, प्रा.विरटे यांनी केले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा तसेच वेळेचे नियोजन, स्पर्धा परिक्षा, मुलाखती, शासकीय व खाजगी क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या संधी व त्यासाठी लागणारी तयारी या सर्वांवर प्रकाश टाकला. त्यांच्या या शैक्षणिक उपक्रमाला संस्थेचे अध्यक्ष डॉ.विपक लध्दड व प्राचार्य डॉ.प्रदीप जावंधीया यांनी शुभेच्छा दिल्या.

लोकमत

# देशमुख यांनी दिले नाशिकात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**बुलडाणा :** स्थानिक पंकज लध्दड अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा.गणेश देशमुख यांनी भारतातील सर्वात मोठा शैक्षणिक समुह असलेल्या संदीप फाऊंडेशन नाशिक येथे स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या ५०० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सदर व्याख्यानात त्यांनी अभ्यास का करावा, कसा करावा, वेळेचे नियोजन कसे करावे व स्वत: मधील क्षमता ओळखून जीवनात यशस्वी कसे व्हायचे यावर मार्गदर्शन केले. आजची परिक्षा पध्दती, परिक्षेत विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या चुका व त्यावर उपाय योजना, प्रत्येक क्षेत्रात वाढत असलेली स्पर्धा, ध्येय गाठण्यासाठी लागणारे अथक प्रयत्न, चिकाटी, घरातील आर्थिक परिस्थितीची जाणीव या सर्व बाबींवर प्रकाश टाकला. त्यानंतर शिक्षण झाल्यानंतर उपलब्ध असणारे कोर्सेस



त्यांच्या पुर्वपरिक्षा, मुलाखती याबद्दल सखोल मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांनी स्वत: जवळील प्रत्येक मिनिट वापरुन व स्वत:च्या भाषेत सर्व विषयाच्या नोट्स काढून जास्तीत जास्त अभ्यास करावा असे प्रा.देशमुखांनी यावेळी सांगितले. यावेळी विभागप्रमुख प्रा.बिडकर, प्रा.शंतनु पांडे व इतर सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. (वा.प्र.)

Hello Buldhana
Page No. 2 Aug 09, 2017
Powered by: erelego.com

# जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर ध्येय निश्चित करा : प्रा. देशमुख

**मोताळा** | विद्यार्थी दशेत जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर प्रतयेक विद्यार्थ्यांनी प्रथम ध्येय निश्चित केले तर निश्चित ध्येय प्राप्त होऊ शकते, असे प्रतिपादन मोटीव्हेटर प्रा. गणेश देशमुख यांनी केले. कुसुमावती भीमराव जाधव नॉलेज हब अंतर्गत सावित्री जिजाऊ जन्मोत्सव प्रसंगी मिशन विजयस्तंभ अंतर्गत अभ्यासमंच, मोटीव्हेशनल स्पीच, अभ्यास कसा करावा त्यासाठी वेळेचे नियोजन कसे करावे, सकारात्मक विचारांचा फायदा, जिद्द, मेहनत, चिकाटी या विषयी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे होत्या. यावेळी उपप्राचार्य एन. जी नारखेडे, रविकिरण वानखेडे, प्रा. अनिल शिंदे हे होते. सुत्रसंचालन प्रा. संतोष ढाले यांनी केले.

# विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी ध्येय निश्चि करावे : प्रा.गणेश देशमुख

**मोताळा, ता. ६ :** जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी प्रथम ध्येय निश्चित करावे, तरच यशाच्या आकाशाला गवसणी घालणे शक्य आहे, असे प्रतिपादन प्रा. गणेश देशमुख यांनी शनिवारी केबीजे नॉलेज हब बोराखेडीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना केले.

कुसूमावती भीमराव जाधव नॉलेज हब बोराखेडी येथे सावित्री-जिजाऊ जन्मोत्सव निमित्त मिशन विजयस्तंभ अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. प्राचार्या डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यशाळेत मोटिव्हेटर प्रा. गणेश देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी स्पर्धात्मक परीक्षेकरिता अभ्यास व वेळेचे नियोजन कसे करावे, याबाबत सांगितले. तसेच सकारात्मक विचारांचा फायदा, जिद्द, मेहनत, चिकाटीतून ध्येय प्राप्तीचा मार्ग निघतो, असे मत व्यक्त केले. दरम्यान, बारावी नंतर उपलब्ध असणारे विविध कोर्सेस, शासकीय व खासगी क्षेत्रातील विविध संधी आदी बाबींवर प्रकाश टाकला. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. प्राचार्या डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी तत्पर राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन संतोष ढाले यांनी केले. यावेळी उपप्राचार्य एन.जी. नारखेडे, रविकिरण वानखेडे, प्रा. अनिल रिंढे यांच्यासह शिक्षक बांधव व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

**लोकमत**

## महत्त्वाचे



### जे जे स्कूल ऑफ स्कॉलर्समध्ये वार्षिक स्नेहसंमेलन

बुलडाणा : जे.जे.स्कूल ऑफ स्कॉलर्स मध्ये १७ जानेवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे प्राचार्य गोविंद गायकी, गणेश देशमुख, भीमराव जाधव, कुसुमावती जाधव, जयंतराव जाधव, विजयालक्ष्मीताई वानखेडे, आफ्रीन शेख, काझी शेख आदींची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम यावेळी सादर केले. कार्यक्रमाला पालकांचीही उपस्थिती होती.

## ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

बुलडाणा, ता. १० : स्थानिक उर्दू ज्युनिअर कॉलेजमध्ये बारावीच्या २०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यास विषयक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

प्रा. गणेश देशमुख यांनी अभ्यास कसा करावा, वेळेचे नियोजन, स्वत:मधील क्षमता, परीक्षेत होणाऱ्या चुका, वाढती स्पर्धा, या सर्व बाबींवर प्रकाश टाकला, बारावी नंतर उपलब्ध अभ्यासक्रम त्यातील संधी यावर मार्गदर्शन केले. अध्यक्ष, प्राचार्य, शेख जावेद इस्माईल हे होते. सूत्रसंचालन सैय्यद शफीक यांनी केले. सैय्यद मतीन इरफानुल्लाह खान, फय्याज अहेमद कुरेशी, एम.ए.मारूफ यांनी आयोजनाकरिता प्रयत्न केले.

# वेळेचे नियोजन हीच यशाची गुरुकिल्ली- प्रा.देशमुख



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा.गणेश देशमुख

**कार्यालय प्रतिनिधी/२९ नोव्हेंबर**

**बुलडाणा** : विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा, वेळेचे नियोजन कसे करावे, परिक्षेमध्ये होणाऱ्या चुका व त्याचे निवारण, स्वतःमधील क्षमता, प्रत्येक क्षेत्रात वाढत असलेली स्पर्धा, ध्येय गाठण्यासाठी लागणारे अथक प्रयत्न या सर्व बाबींवर प्रा.गणेश देशमुख यांनी श्री शिवाजी हायस्कूल बुलडाणा येथे आज २९ नोव्हेंबर रोजी मार्गदर्शन केले. दहावीनंतर उपलब्ध असणारे सर्व कोर्सेस व त्या क्षेत्रातील संधी व मर्यादा यांच्यावरही प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य पराते, प्रा.पठाण, सौ.धोरण व शिक्षक उपस्थित होते. सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

# शिवाजी विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांची कार्यशाळा

**बुलढाणा, ३ डिसेंबर**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध वक्ते गणेश देशमुख यांनी शिवाजी हायस्कूल बुलढाणा येथील दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा, वेळेचे नियोजन कसे करावे, परीक्षेमध्ये होणाऱ्या चुका व त्याचे निवारण, स्वतःमधील क्षमता, प्रत्येक क्षेत्रात वाढत असलेली स्पर्धा, ध्येय गाठण्यासाठी लागणारे अथक प्रयत्न या सर्व बाबींवर मार्गदर्शन केले. दहावी उपलब्ध असणारे सर्व कोर्सेस व त्या क्षेत्रातील संधी व मर्यादा यांच्यावरही प्रकाश टाकला.



मार्गदर्शन करतांना गणेश देशमूख

या कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य पराते, पठाण, धोरण, व सर्व शिक्षक उपस्थित होते.

सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला व या कार्यक्रमातून आमच्या अभ्यासाला नेमकी दिशा मिळाली, असे मनोगत व्यक्त केले. *(तभा वृत्तसेवा)*



बुलडाणा : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गणेश देशमुख.

# वेळेचे नियोजन हिच यशाची गुरुकिल्ली

**बुलडाणा, ता. ७ :** वेळेचे नियोजन हीच खरी यशाची गुरुकिल्ली असल्याचे प्रतिपादन प्रा.गणेश देशमुख यांनी नुकतेच केले. येथील श्री शिवाजी विद्यालय कनिष्ठ महाविद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला प्राचार्य दिलीप पराते, पठाण, धोरण मॅडम यांची उपस्थिती होती. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा, वेळेचे नियोजन कसे करावे, परीक्षेत होणाऱ्या चुका त्याचे निवारण, स्वत:मधील क्षमता, प्रत्येक क्षेत्रात वाढत असलेली स्पर्धा, ध्येय गाठण्यासाठी लागणारे अथक परिश्रम या सर्व बाबींवर त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच दहावीनंतर उपलब्ध असणाऱ्या सर्व कोर्सेस त्या क्षेत्रातील संधी मर्यादा यांच्यावरही त्यांनी प्रकाश टाकला. जवळपास चारशे

# स्पर्धेला सामोरे जातांना वेळेचे नियोजन आवश्यक : प्रा.गणेश देशमुख



**शेलसुर, २५ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी)** : विद्यार्थ्यांनी स्पर्धा परिक्षेची तयारी ही शालेय जिवनापासून सुरू करावी व स्पर्धेला सामोरे जातांना वेळेचे नियोजन करावे असे प्रतिपादन प्रख्यात वक्ते व पी.एल.आय.टी. बुलडाणाचे स्थापत्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.गणेश गायकवाड यांनी शेलसूर येथे श्री शिवानी हायस्कूल व कनिष्ठ कला महाविद्यालयात आयोजीत व्यक्तीमत्व विकास कार्यक्रमात बोलतांना केले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एस.ए.देशमुख, पर्यवेक्षक बी.ए.सोनुने, प्रा.व्ही.आर. घ्याळ, प्रा.पी.जी.खरात, प्रा.आर.वाय. जाधव यांनी प्रामुख्याने उपस्थित होती. यावेळी पुढे बोलतांना प्रा.देशमुख यांनी ग्रामिण विद्यार्थ्यांच्या नकारात्मक मानसिकतेवर बोट ठेवत त्यांच्यातील प्रतिभा जागृत करण्यासाठी विविध उपाययोजनांची माहिती दिली. ग्रामिण विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी अभ्यास कशा पध्दतीने करावा याचीही माहिती त्यांनी दिली. विद्यार्थ्यांना उच्च ध्येय समोर ठेवून वाटचाल केल्यास व वेळेचे नियोजन केल्यास ग्रामिण विद्यार्थीही युपीएससी, एमपीएससी परिक्षेत नेत्रदिपक यश मिळवू शकतात असे सांगून शेवटी विविध स्पर्धा परिक्षा व त्यातील परिक्षा तंत्राची माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डी.एस.कापसे यांनी, प्रास्ताविक बी.ए.सोनुने यांनी केले.

# स्पर्धेला सामोरे जातांना वेळेचे नियोजन आवश्यक - प्रा. देशमुख



मार्गदर्शन करतांना प्रा.देशमुख

*वार्ताहर/२५ ऑगस्ट*

**शेलसूर ता.चिखली:** विद्यार्थ्यांनी स्पर्धा परिक्षेची तयारी शालेय जीवनापासून सुरु करावी व स्पर्धेला सामोरे जातांना वेळेचे नियोजन करावे असे प्रतिपादन प्रख्यात वक्ते व पी.एल.आय.टी. बुलडाणाचे स्थापत्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.गणेश देशमुख यांनी केले. शेलसूर येथे श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ कला महाविद्यालयात आयोजीत व्यक्तीमत्व विकास कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एस.ए.देशमुख हे होते तर पर्यवेक्षक बी.ए.सोनुने, प्रा.व्हि. आर.घ्याळ, प्रा.पी.जी. खरात, प्रा.आर.वाय.जाधव यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. पुढे बोलतांना प्रा.देशमुख यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या नकारात्मक माणसिकतेवर बोट ठेवत त्यांच्या तील प्रतिभा जागृत करण्यासाठी विविध उपाययोजनांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना उच्च ध्येय समोर ठेवून वाटचाल केल्यास व वेळेचे नियोजन केल्यास ग्रामीण विद्यार्थीही यू.पी.एस.सी, एम.पी.एस.सी परिक्षेत नेत्रदिपक यश मिळवु शकतात असे सांगून विविध स्पर्धा परिक्षा व त्यातील परिक्षा तंत्राची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन डी.एम.कापसे यांनी, तर प्रास्ताविक बी.ए.सोनुने यांनी केले.

## न्यूज ब्रीफ

# स्पर्धेला सामोरे जाताना वेळेचे नियोजन आवश्यक : प्रा. देशमुख



बुलडाणा | 'विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी ही शालेय जीवनापासून सुरू करावी. तसेच स्पर्धेला सामोरे जाताना वेळेचे नियोजन करावे', असे प्रतिपादन स्थापत्य शास्त्राचे विभाग प्रमुख प्रा. गणेश देशमुख यांनी केले.शेलसुर येथील श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ कला महाविद्यालयात आयोजित व्यक्तीमत्व विकास कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एस.ए. देशमुख हे होते. तर पर्यवेक्षक बी.ए. सोनुने, प्रा. व्ही.आर. घ्याळ, प्रा.पी.जी. खरात, प्रा. आर.वाय. जाधव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डी.एम. कापसे यांनी तर प्रास्ताविक बी.ए. सोनुने यांनी केले. कार्यक्रमाला शिक्षक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रा. गणेश देशमुख यांचे वीरमाता जिजाबाई अभियांत्रिकी महाविद्यालयात व्याख्यान



प्रा. देशमुख यांच्यासोबत उपस्थित विद्यार्थी

**बुलढाणा, २१ सप्टेंबर** पंकज लद्धड अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा. गणेश देशमुख यांची मुंबई येथील अभियांत्रिकी महाविद्यालय वीरमाता जिजाबाई टेक्नोलॉजिकल इन्स्टिट्यूट येथे प्रेरणादायी वक्ता म्हणून निवड करण्यात आली त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दुसरी गोष्ट म्हणजे अभ्यासाचा कंटाळा जर काही विद्यार्थ्यांना येत असेल, तर त्यांनी एकाच विषयाचा सलग अभ्यास करण्याऐवजी एका दिवसात दोन विषयांचा अभ्यास करावा. उदा. संपूर्ण दिवस जर सुट्टी असेल आणि १४ तास अभ्यास करायचा असेल, तर बऱ्याच वेळेस एकच विषय घेऊन बलो तर कंटाळा येतो. म्हणून सात तास एक विषय आणि सात तास दुसरा विषय अशा प्रकारे अभ्यास केला तर उत्साह कायम राहतो. बरेच विद्यार्थी एका दिवसात तीन ते चार विषयांचा अभ्यास करतात. सकाळ, दुपार, संध्याकाळ आणि रात्र अशा चार वेळेस चार वेगवेगळे विषय अभ्यासासाठी घेतात. पण, माझ्या मते एक किंवा दोन विषय एका दिवसात पुरेसे आहेत. चार विषय हाताळल्याने 'एक ना धड भराभर चिंध्या' अशीच परिस्थिती निर्माण होईल. विषय निवडल्यानंतरही त्या विषयातील सर्व सोप्या घटकांचा अभ्यास पहिले करुन घ्यावा आणि नंतरच कठीण घटकांना-मुद्यांना हाताळावे. संपूर्ण विषयांमध्ये एकूण ६० ते ७० टक्के भाग सोपा असेल आणि त्याची तयारी झाली की मग विषय सोपा वाटतो आणि उरलेल्या ३० ते ४० टक्के कठीण भागाचा अभ्यास करण्यासाठी आत्मविश्वासही वाढतो. पहिले सोपा भाग की कठीण भाग या विषयावर प्रत्येकाचे मत हे वेगवेगळे आहे. पण, कठीण भागाचा अभ्यास पाहिले केल्यास उरलेल्या सोप्या भागासाठी आवश्यक तेवढा वेळ अभ्यासासाठी उरतो का हेही तपासून पहावे, नाही तर विनाकारण कठीण गोष्टींचा अभ्यास खूप केला आणि सोप्या व हमखास मार्क्स मिळवून देणाऱ्या घटकांचा अभ्यासच केला नाही अशी परिस्थिती उद्भवू शकते आणि परीक्षेमध्ये एवढे कठीण प्रश्न आले की, कठीण घटकांचा अभ्यास करुनही काहीच फायदा जाला नाही, अशी वेळ विद्यार्थ्यांवर येऊ नये, मागील पाच ते सहा प्रश्नपत्रिका बघीतल्यानंतर बऱ्याचदा कोणता प्रश्न कोणत्या प्रश्नाला ऑप्शनल आहे हेही काही विषयांमध्ये बऱ्यापैकी स्पष्ट होते. विद्यार्थ्यांनी या ऑप्शनला प्रश्नांचाही आढावा घ्यावा. अभ्यास करताना संपूर्ण विषयाचा अभ्यास करावा ऑप्शनल प्रश्न आहे म्हणून तो सोडून देऊ नये. कदाचित ऑप्शनल प्रश्नांचा अभ्यास नाही केला, तरीही तुमच्या एकूण मार्क्सवर परिणाम होणार नाही. पण, तो ऑप्शनल ऑप्शनल भाग कदाचित पुढे स्पर्धा परीक्षा, प्रवेश परीक्षा, नौकरी संदर्भातील मुलाखत इत्यादी ठिकाणी कामात येऊ शकतो किंवा त्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा असू शकतो. अभ्यासाचा कंटाळा येऊ नये म्हणून काही विद्यार्थी ग्रुप स्टडीचा पर्याय निवडतात. ग्रुप स्टडी चांगले की, एकट्याने अभ्यास करणे चांगले हे प्रत्येक विद्यार्थ्यांनी स्वत:साठी स्वत:च ठरवावे. ग्रुप जर चांगला असेल त्यातील प्रत्येक विद्यार्थी जर अभ्यासाबाबत गंभीर असेल तरच ग्रुप स्टडी करा अन्यथा हुशार विद्यार्थ्यांचा ग्रुप स्टडीमध्ये वेळच वाया जातो. त्यामुळे ग्रुप स्टडीपेक्षा एकट्याने अभ्यास करणे कधीही चांगलेच आहे, असे मला वाटते. विद्यार्थ्याला स्वत:च्या स्वभावावरुन लगेच लक्षात येते की, आपल्यासाठी ग्रुप स्टडी योग्य आहे की एकटे अभ्यास करणे योग्य आहे. सतर लोकांचा या निर्णयामध्ये सल्ला घेऊ नये. सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक यांनी हे सदर दर सोमवारी वाचावे. वा पहिले घेऊन गेलेले सदर पाहिजे असल्यास खालील व्हॉ

# आत्मविश्वास यशाचा कणा



प्रा.गणेश देशमुख

जे लोक आपले सर्वस्व पणाला लावून आपल्या निश्चयावर अटळ राहतात, हाती घेतलेले काम शेवटास नेतात, ते जगासमोर आदर्श ठरतात. लोकांच्या आदरास पात्र होतात. जगात जेवढी महान कार्य झाली आहेत त्याचा कणा आहे आत्मविश्वास. आत्मविश्वासात एकटा मनुष्यही हजार संकटांशी सामना करेल, अशी विलक्षण शक्ती असते.

गरीब किंवा सामान्य माणसाचे सगळ्यात मोठे धन आणि मित्र म्हणजे त्याचा स्वत:चा आत्मविश्वास. विद्यार्थ्यांना अभ्यास केल्यानंतर एखाद्या परिक्षेत चांगले मार्क्स मिळाले तर त्याचा आत्मविश्वास वाढतो आणि पुन्हा तो पुढच्या परिक्षेचा चांगला अभ्यास करुन चांगले मार्क्स घेतो. केलेल्या प्रयत्नांना यश आले की, साहजिकच माणसाचा उत्साह वाढतो, आत्मविश्वास वाढतो म्हणजेच आत्मविश्वासातून यशप्राप्ती आणि पुन्हा यश प्राप्तीमुळे आत्मविश्वासात वाढ हा जणू प्रवासच सुरु होतो आणि यशाची मालिका सुरु होते. याउलट जर विद्यार्थ्यांनी अभ्यास नाही केला तर परीक्षेत अपयश येते. अपयशामुळे मला काहीच जमत नाही. माझे काही खरे नाही, अशी नकारात्मक भावना निर्माण होते. आत्मविश्वास, अजूनच कमी होत जातो या अपयशातून धडा घेऊन विद्यार्थ्यांनी पुढच्या परीक्षेत चांगले मार्क्स घेणे अपेक्षित असते. पण ९० टक्के अपयशी विद्यार्थी आत्मविश्वास कमी झाल्यामुळे पुढच्या परीक्षेतही पहिले तशी कामगिरी करु शकत नाही. म्हणजेच अपयशातून आत्मविश्वासाचा अभाव आणि पुन्हा आत्मविश्वासाच्या अभावातून पुढचे अपयश ही साखळी सुरु होते. सर्व विद्यार्थ्यांनी मी चांगला अभ्यास करणार आणि त्यामुळे मला परीक्षेत चांगले मार्क्स मिळतीलच किंवा मी ते मार्क्स मिळवणारच अशा दृढ आत्मविश्वास मनात बाळगणे आवश्यक आहे. मी चांगले मार्क्स मिळवणारच हे वाक्य जर दिवसातून एकदा जरी मनात आले तरी स्वत:मध्ये किती प्रचंड ऊर्जा आणि उत्साह निर्माण होतो, याचा अनुभव विद्यार्थ्यांनी एकदा घेऊन पहावा, असे मला वाटते. विद्यार्थ्यांनी भित्र्यासारखे जीवन जगू नये. स्वत:ची जीवनशैली काही विद्यार्थ्यांनी अशी बनवून ठेवली असते की, अभ्यास करण्याची इच्छा नाही, काहीच आत्मविश्वास नाही, परिक्षेची भिती वाटते, घरच्या परिस्थितीमध्ये रडगाणे सांगत राहणे, मोठे ध्येय नाही, अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या जीवनाची जबाबदारी दुसरा कोणीच घेऊ शकत नाही, हे इथे आवर्जुन सांगावेसे वाटते. स्वत:ला हीन, बेकार, तुच्छ समजणाऱ्या व्यक्तीने या जगात काही विशेष कार्य केले असे आजपर्यंत ऐकण्यात नाही. तुम्ही स्वत:ला जेवढे योग्य समजाल, तेवढे चांगले कार्य तुमच्याकडून होईल. तुमच्या ध्येयाचा पायाच आत्मविश्वास आहे. ज्याचा स्वत:वर विश्वास आहे त्याला भविष्याची चिंता भेडसावत नाही. ज्याचे मन संशयाने भरलेले आहे, त्याच्याकडून कधीच काम पूर्ण होत नाही. विद्यार्थी दशेत तुम्ही बरेच जण असे पाहिले असतील, ज्यांच्याकडे बुद्धीमत्ता, योग्यता सारखीच होती. पण फक्त आत्मविश्वासाच्या फरकामुळे त्यांच्या पुढील आयुष्यात खुप मोठा फरक पडलेला आहे. आत्मविश्वास असणारे विद्यार्थी दिवसेंदिवस प्रगती करत आहेत, तर आत्मविश्वास नसणारे विद्यार्थी खुपच साधारण आयुष्य जगत आहेत. केवळ चांगले गुण असून, चालत नाही तर त्या सर्व मुलाचे प्रदर्शन करण्यासाठी जो आत्मविश्वास लागतो तो अतिशय महत्त्वाचा आहे. एखाद्या व्यक्तीजवळ ज्ञान कमी आहे. पण आत्मविश्वास असेल तरीही ती अतिशय कार्यक्षम असते: विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास नाही म्हणून घाबरुन जाऊ नये. डोक्यात कायम प्रेरणादायी सुविचार भरुन ठेवा. मी जिंगलो तरी इतिहास घडवेल आणि हरलो तरी इतिहास घडवेल, या भावनेने कायम वाटचाल करत रहा. महान व्यक्तींना आदर्शस्थानी ठेवा. वाईट परिस्थितीतही नेहमी सकारात्मक विचार करायला शिक. या सर्व गोष्टी आपल्या दैनंदिन जीवनाचा एक भागच झाल्या पाहिजे तरच स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण करता येतो. आत्मविश्वासाला कायम खतपाणी आवश्यक असते. आत्मविश्वास हा तुमच्या मनाचा सेनापती आहे. सेनापती जेव्हा उत्साहाने भरलेला असतो तेव्हा त्याचे सैन्याही उत्साहाने भरुन जाते आणि युद्धामध्ये चांगले कामगिरी करते. अशक्य हा शब्दच सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या शब्दकोषातून काढून टाकावा. भीती, शंका, निराशा, द्वेष, ईर्षा, मत्सर, संशय या सर्वातून आत्मविश्वास आपल्याला कायमचा मुक्त करतो.

(लेखक हे विचारधन पुस्तकाचे लेखक व प्रसिद्ध प्रेरणादायी वक्ते आहेत.

# ध्येयनिश्चिती हीच खरी जीवनाची पहिली पायरी

कोणत्याही मोठ्या यशाचा आरंभबिंदू म्हणजे तुम्हाला नेमके काय पाहिजे याचा स्पष्ट निर्णय होय. अभ्यास कसा करावा या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी सर्वप्रथम अभ्यास का करावा या प्रश्नाचे उत्तर शोधणे आवश्यक आहे. दिवसेंदिवस वाढत असलेल्या जीवघेण्या स्पर्धेमध्ये टिकविण्यासाठी व चांगले करिअर घडविण्यासाठी अभ्यासाशिवाय दुसरा मार्ग नाही हे सर्व विद्यार्थ्यांनी समजून घ्यावे. साधारणत: ६० टक्के विद्यार्थी असे असतात की, त्यांना पुढे जीवनात काय करायचे हेच माहित नसते किंवा ते ठरवत नाहीत. ते फक्त शिक्षण घेत राहतात.


प्रा.गणेश देशमुख

खुप मेहनत करुन, चांगला अभ्यास करुन एखादी गोष्ट आपल्याला साध्य करायची आहे, असे त्यांना कधीच वाटत नाही. म्हणजेच त्यांचे करिअर विषयी व एकंदरीत जीवनाविषयी ध्येय निश्चित नसते, असे विद्यार्थी परीक्षेत किंवा जीवनात खुप चांगली कामगिरी कधीच करु शकत नाही. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी स्वत:समोर संपूर्ण जीवनासाठी एक मोठे ध्येय ठेवणे अत्यावश्यक आहे. ध्येयाचे साधारणत: दोन प्रकार करता येतील. एक म्हणजे दीर्घकालीन ध्येय व दुसरे म्हणजे लघुकालीन ध्येय. दीर्घकालीन ध्येय हे फक्त विद्यार्थ्यांनाच लागू होत नाही. तर समाजातील सर्व लोकांना लागू होते. ध्येयहीन माणसाचे आयुष्य. हे समुद्रात भरकटलेल्या जहाजाप्रमाणे असते. कुठे पोहोचायचे आहे हे जर आपल्याला माहित नसेल, तर संपूर्ण जीवनप्रवास व्यर्थ जाऊ शकतो. 'जिंदगी की तलाश में हम मौत के कितने पास आ गये', अशी परिस्थितीही होऊ शकते, दीर्घकालीन ध्येयामध्ये मला शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक इत्यादी दृष्ट्या सक्षम व्हायचे म्हणजेच मला सुख, समाधान, प्रसिद्धी, पैसा, वरिष्ठ पदाची नौकरी मिळवायची अशा प्रकारचे ध्येय सर्व विद्यार्थ्यांचे असले पाहिजे. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, मला डॉक्टर, इंजिनिअर, आयएएस/आयपीएस पदाधिकारी, वकील, उद्योजक, प्राध्यापक इत्यादी व्हायचे असे ध्येय विद्यार्थ्यांचे पाहिजे. दीर्घकालीन ध्येय जोपर्यंत ठरत नाही, तोपर्यंत कुठल्याच प्रकारच्या अभ्यासाला किंवा प्रयत्नांना सुरुवात होत नाही. विद्यार्थ्याने दिवसातून चार वेळेस आपल्या ध्येयाला आठवावे म्हणजे तुमचे अभ्यासात लक्ष लागेल. अभ्यासाला बसायची इच्छा न होणे म्हणजे आपल्या जीवनात काहीही ध्येय नाही हे स्पष्ट होते. आता राहिला प्रश्न तो हे दीर्घकालीन ध्येय गाठायचे कसे? दीर्घकालीन ध्येय गाठण्यासाठी काही लघुकालीन ध्येय निश्चित करणे आवश्यक आहे. लघुकालीन ध्येय म्हणजे दुसरे तिसरे काही नसून दीर्घकालीन ध्येयाचे योग्य विभाजन होय. उदा. दरवर्षीच्या परीक्षेत किंवा एखाद्या विशिष्ट प्रवेश परीक्षेमध्ये उत्तम गुण मिळविण्यासाठी दररोज संपूर्ण ताकद लावून अभ्यास करणे व ते गुण मिळवणे हे झाले तुमचे दरवर्षीचे लघुकालीन ध्येय.

ध्येय ठरविण्यासाठी बऱ्याच वेळेस विद्यार्थ्यांचा वयाचा अनुभव कमी असल्यामुळे त्यांना अडचणी येऊ




शकतात. अशा वेळेस ध्येय म्हणजे काय, ध्येयाचे जीवनात काय महत्त्व आहे, हे पालकांनी व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजवून सांगणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात उपलब्ध असणारे सर्व अभ्यासक्रम, त्यातील संधी, मर्यादा, स्पर्धा इत्यादी विषयी शिक्षकांनी व पालकांनी विद्यार्थ्यांना सतत मार्गदर्शन करावे म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांची स्वत:ची आवड व समाजातील वस्तुस्थिती याची सांगड घालून स्वत:चे मोठे ध्येय ठरवता येईल.

मोठे ध्येय असेल तरच विद्यार्थी यशस्वी होतात. पालक किंवा शिक्षक रागावतात म्हणून विद्यार्थ्याने अभ्यास करु नये. अभ्यास करुन मला माझे चांगले जीवन घडवायचे आहे, असा विचार विद्यार्थ्यांनी केला पाहिजे, असे केल्यास अभ्यासाचा कंटाळा न वाटता तो अतिशय आनंददायी वाटेल.

ध्येय निश्चित नसलेले विद्यार्थी शालेय जीवनात केवळ मौजमजा करत राहतात आणि वेळ निघून गेल्यानंतर आयुष्यभर पश्चाताप करत राहतात. याउलट समजुतदार विद्यार्थ्यांसमोर संपूर्ण जीवनाचा नकाशा तयार असतो व तो त्यानुसार वाटचाल करत राहतो. ध्येय निश्चित असलेला विद्यार्थी जर जीवनात दहा चुका करत असेल, तर ध्येय नसलेला विद्यार्थी दहा हजार चुका करतो. म्हणूनच माझे सर्व विद्यार्थ्यांना आवाहन आहे की, अभ्यास न करता आपण खुप चांगले जीवन जगू शकतो, हा गैरसमज डोक्यातून काढून टाका, अभ्यासाशिवाय पर्याय नाही व आपली अभ्यासातून सुटका नाही हे कायमच मनावर कोरुन ठेवा, मोठी स्वप्ने पहा, मोठी स्वप्नेच माणसांचे रक्त ढवळू शकतात. मेहनतीने आणि अभ्यासाने सर्व काही शक्य आहे.

प्रत्येक आठवड्याला फक्त एकाच विषयावर आपण चर्चा करत असतो. त्यामुळे अभ्यास हा पूर्ण विषय समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी, पालकांनी, शिक्षकांनी वा सदराचे सलग वाचन करावे. सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी हार्दिक शुभेच्छा.



Oragnised by
Rajarshi Shahu Multi state Society
तुमच्या जीवनाला वळण देण्याचा
एक छोटासा प्रयत्न
एक ध्येयवेडा प्रवास....
Renowned Motivational Speaker &
Author Of Maharashtra
Prof.Ganesh Deshmukh
BE (Civil),ME (Structures), AMIE, LMISTE
CAREER CRUISE 1.0
CAREER
Education
Values
Goals
Interests
Skills
Vision
Confused...?
१० वी / १२ वी नंतर काय ???
Career is a
lifelong Journey
that is developed
rather than Chosen
Sunday : 15 April 2018
Time : 4:30 to 7:30
Venue : Sainik Mangal Karyalai,
Near Bus Stand, Buldana
Presented by
Contact Us At Our Various Branches
Patil Coaching Classes, Aurangabad
8149999954 / 7743989049
patilcoaching@gmail.com
www.patilclasses.com
Patil's
A Step towards Smart Education

१० वी ची परिक्षा दिलेले विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्या करीता बुलडाणा शहरात प्रथमच मुंबई येथिल PACE, IIT & Medical घेवुन येत आहे सुवर्ण संधी...

# Free Seminar

# At Buldana on 6th April 2018

## "CREATE YOUR CHILD'S FUTURE IN IIT & MBBS"

### Outcome of this seminar

1) How to Crack IIT/JEE/NEET ?
2) How to Create intrest in Study ?
3) How to Achieve Your Goal.
4) What is Success & How to Achieve ?
5) How to Focus in Study ?

Motivational PACE Trainer



**Mr. Sandeep Singhal**
B.Tech from IIT-R (24 yrs Experience) Pace IIT Faculties

**Mr. Aniket Akhade**
B.Tech.(Chemical Eng.)
Head of Foundation builder Programme
Pace IIT & Medical Mumbai

Chief Guest
**Prof. Ganesh Deshmukh**
(Renowned Motivational Speaker of Maharashtra)

**Venue: Garde Hall, Buldana**
**Date: 06/04/2018**
**Time: 5:30 pm to 8:00 pm.**

Shree Graphics Akola 7775914864

PACE IIT | MEDICAL | FOUNDATION

No.1 Institute of Maharashtra NOW in BULDANA

Circular road near mahajan xerox, Saraswati Nagar, Buldana.
Mob:9067950795 / 9156765628 Email: buldana@iitianspace.com

# राजस्थान कॉन्व्हेंट व गंगा माँ विद्या मंदीर

## रिसोड मधील सर्व पालकांसाठी भव्य व्याख्यानाचे आयोजन

Effective Parenting सुजान पालकत्व ...

**व्याख्याता : प्रा.गणेश देशमुख** (सुप्रसिध्द प्रेरणादायी लेखक,वक्ते व शिक्षण तज्ञ)

* एकत्रीत कुटुंबाचा फायदा,आव्हाणे व समाधानाचे सखोल विश्लेषन.
* मुलांच्या जन्मा पासुन ते युवा अवस्थे पर्यंत आई वडीलांचे त्याच्या प्रति संस्कार,कर्तव्य,भुमीका आणि व्यवहार कसा असावा यावर सविस्तर मार्गदर्शन
* शंभर पुस्तकाचे वाचन केलेल्या गुरूचे एका तासाचे व्याख्यान ऐकने म्हणजे दहा वर्षाचा अनुभव घेणे होय.
* परिवारातील सर्वा करीता अत्यंत लाभकारी

**दिनांक व वेळ : शनिवार दि. २६/०१/२०१९ सायं. ५ वा. ३० मी.**

**स्थळ : राजस्थान कॉन्हेंट व गंगा माँ विद्या मंदीर,हिंगोली रोड,रिसोड**

कार्यक्रम वेळेवर सुरू होईल.

## Risod Talent Search Examination 2019

### खास वैशिष्ट्ये

* MPSC / UPSC, NEET / JEE-IIT च्या धर्तीवर वर्ग ४ वी पासुन ते ९ वी पर्यंत प्रत्येक वर्गासाठी घेतली जाणारी एकमेव परिक्षा.
* वस्तुनिष्ठ प्रश्न पत्रिका.
* रिसोड शहर व तालुक्यात होणारी एकमेव परिक्षा
* मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी एकमेव स्पर्धा परिक्षा
* STATE BOARD CBSE & ICSE पॅटर्नसाठीची एकमेव परिक्षा.
* ग्रामीण व शहरीभागातील विद्यार्थ्यांना स्पर्धापरिक्षेची गोडी लागावी यासाठीचा अभिनव उपक्रम.
* पहिल्या १० टॉपर्स विद्यार्थ्यांना मिरीट सर्टीफिकेट

### तालुकास्तरावरील पारितोषिके

#### प्रत्येक वर्गासाठी

प्रथम : १० ग्रॅम चांदीचे मेडल व प्रमाणपत्र

द्वितीय : ५ ग्रॅम चांदीचे मेडल व प्रमाणपत्र

तृतीय : जॉमेट्रीकल किट व प्रमाणपत्र

### * परिक्षेचा तपशिल

| | |
|---|---|
| * परिक्षा दिनांक | : १० फेब्रुवारी २०१९ रविवार |
| * वेळ | : स. १०.३० ते दु. १२.४० |
| * परिक्षा आवेदन पत्र भरण्याचा शेवटचा दिनांक | : ३१ जानेवारी २०१९ |
| * प्रश्न पत्रिकेचे स्वरूप | : वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| * प्रश्न संख्या | : १०० |
| * गुण | : २०० (प्रत्येक प्रश्नास २ गुण) |
| * परिक्षेचे माध्यम | : मराठी व इंग्रजी |

| | |
|---|---|
| 20% | बुध्दीमत्ता चाचणी |
| 15% | चालु घडामोडी व सामान्य ज्ञान |
| 15% | अंकगणित |
| 12% | विज्ञान |
| 10% | भुगोल / अर्थशास्त्र |
| 10% | इतिहास |
| 8% | इंग्रजी व्यकरण |
| 7% | मराठी व्याकरण |
| 3% | ना.शा / राज्यशास्त्र |

**विनीत : राजस्थान कॉन्हेंट व गंगा माँ विद्या मंदीर,रिसोड**

श्री.छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था,मोताळा द्वारा संचालित



# कुसुमावती भीमराव जाधव नॉलेज हब,
## बोराखेडी ता.मोताळा जि.बुलडाणा.

# सावित्री - जिजाऊ जन्मोत्सव



## सन २०१८

मान्यवर ________________________________________

________________________________________ स.न.

आमच्या विद्यालयात दरवर्षीप्रमाणे सावित्री – जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी समारंभास अगत्य येण्याचे करावे ही विनंती.

## - कार्यक्रम पत्रिका -

**बुधवार दि.३/१/२०१८ -**

सकाळी १० वा. सावित्री जिजाऊ जन्मोत्सव शोभायात्रा

विषय - इंधन वाचवा

हिरवी झेंडी - शोभायात्रा

* मंगलहस्ते - सौ.छाया विश्वास पाटील(सरपंच,परडा नेहरुनगर)
सौ.ज्योती निळकंठ व्यवहारे(ग्रा.पं.सदस्या फर्दापुर ता.)
सौ.शिला श्रीकृष्ण खराटे(सरपंच,मुर्ती)
श्री.सुरेश गर्दे (सरपंच,बोराखेडी)

**गुरुवार दि.४/१/२०१८ -**

सकाळी ९ वा. विवीध क्रिडास्पर्धा

**शुक्रवार दि.५/१/२०१८**

सकाळी १०:३० वा. - वादविवाद स्पर्धा व गित गायन स्पर्धा

विषय - सोशल मिडीयाचा वापर योग्य कि अयोग्य

**शनिवार दि.६/१/२०१८** अभ्यास मंत्र (Motivational Speech)

सकाळी १०:३० वा. - प्रा.गणेश देशमुख,बुलडाणा

**रविवार दि.७/१/२०१८ - सहल - अजिंठा लेणी**

**शुक्रवार दि.१२/१/२०१८**

सकाळी १०:३० वा. - शिक्षकांचे कथाकथन (विषय-ऐतिहासिक)
- फॅन्सी ड्रेस स्पर्धा (विद्यार्थ्यांसाठी)

- विनीत -

**प्राचार्या डॉ.विजयालक्ष्मी वानखेडे**

तथा सांस्कृतिक समिती के.बी.जे.नॉलेज हब, बोराखेडी ता.मोताळा

Shri.Chhatrapati Shahu Maharaj Shikshan
Sanstha's Reg .No.F-597

**JJ School of Scholars**

Future Founders

# Invitation

## Annual Programme 2018

Mr./Mrs. ______________________________

We the Principal, Teachers, Students of JJ School of Scholars, invites you to be with us for our Annual Function on 17 January 2018

**Time - 4.00 Pm to 7.00 Pm At JJ School of Scholars, Near Krida Sankul, Behind ITI College, Buldana**

### Chief Guest

- Hon'ble **Mr.Govind Gayki**
  Renowned Poet & Principal
  Raje Chhatrapati Art College
  Dhamangaon Badhe.
- Hon'ble **Mr.Ganesh Deshmukh**
  Renowned Motivational Speaker in Maharashtra
  & Professor in PLIT College Buldana .

### In the Presence of -

- Hon'ble **Mr.Bhimrao S.Jadhao**
  Founder President, Shri.Chhatrapati Shahu Maharaj
  Shikshan Sanstha ,Motala.
- Hon'ble **Mrs.Kusumavati B.Jadhao**
  Chairman, Shri.Chhatrapati Shahu Maharaj
  Shikshan Sanstha ,Motala.
- Hon'ble **Mr.Jayant B.Jadhao**
  President,
  JJ School of Scholars, Buldana.

With Regards
**Mrs.Afrin**
Principal
JJ School of Scholars, Buldana

12



## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती
## तथा क्रिडा व सांस्कृतीक मंडळ बुलडाणा
र.नं. एफ./२५३२



# फुले आंबेडकर जयंती सोहळा

सर्व जनतेस कळविण्यात आनंद होत आहे की दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुध्दा क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची १९० वी जयंती तसेच विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२६ वी जयंती **जागतिक ज्ञान दिनानिमित्त** विविध स्पर्धा आणि प्रबोधनाच्या माध्यमातुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती तथा क्रिडा व सांस्कृतिक मंडळ, बुलडाणाच्या वतीने हर्षोल्हासाने व मंगलमय वातावरणात साजरी करण्याचे योजिले आहे. तरी या मंगलमय सोहळ्यास आपणा सर्वांची उपस्थिती अगत्याची आहे.

### ❊ कार्यक्रमाची रूपरेषा ❊

### क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले जयंती सोहळा

दिनांक : ११/४/२०१७ वार मंगळवार, वेळ : स.०९.०० वाजता.
कार्यक्रमाचे अध्यक्षा : आयु. सिंधुताई अंभोरे
प्रमुख उपस्थिती : आयु. उषाताई कांबळे
आयु. सखुबाई चव्हाण
आयु. अर्चना रामटेके

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळा

दिनांक : १४/४/२०१७ वार शुक्रवार सकाळी ९.०० वाजता ध्वजारोहण, त्रिशरण, पंचशिल व वक्त्यांचे मार्गदर्शन
कार्यक्रमाचे अध्यक्ष : आयु. चंद्रकांत आराख, लेखाधिकारी शिक्षण विभाग, बुलडाणा
प्रमुख मार्गदर्शक : आयु. प्रा. गणेश देशमुख, B.E. Civil, M.E. Structure
पंकज लध्दड अभियांत्रिकी महाविद्यालय, बुलडाणा.
विषय : अभ्यास कसा करावा? इयत्ता ९ वी ते पुढील सर्व विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन
प्रमुख उपस्थिती : आयु. मोहम्मद सज्जाद, सदस्य न.पा. बुलडाणा व सामाजिक कार्यकर्ता, बुलडाणा
आयु. रमेश खंडारे, कवि / कथाकार, सामाजिक कार्यकर्ता, साखळी बु॥
आयु. जे. एन. रामटेके सर
आयु. सुभद्राताई इंगळे, सदस्य न.पा. बुलडाणा
आयु. वैशालीताई इंगळे, सदस्य न.पा. बुलडाणा

### ❊ चित्रकला स्पर्धा ❊

दिनांक : १३/४/२०१७ वार गुरूवार

गट अ) इयत्ता १ ली ते ४ थी, विषय :- दिलेल्या चित्रात रंग भरा वेळ : सायं. ४.३० ते ०६.००
ब) इयत्ता ५ वी ते ८ वी, विषय :- विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चित्र काढून रंगवा.वेळ : सायं. ४.३० ते ६.०० वाजेपर्यंत
संपर्क :- १) आयु. एस. यु. झिने, मोबा. ९४२३४४७७४० २) आयु. आर.बी. गवई मोबा. ९०११३४२३३४
३) आयु. शिवनारायण गवई, मो.नं. ७८४१८११४५३
टिप : १) स्पर्धकांना रंग सोबत आणावा लागेल.
सुचना : १) वरील सर्व स्पर्धकांसाठी नांव नोंदणी शुल्क प्रत्येकी रू. १० राहील. २) नोंदणी शुल्क संपर्क प्रमुखाकडे किंवा विश्वशांती बुध्दविहारामध्ये जमा करावी. ३) नांव नोंदणीची व शुल्क जमा करण्याची अंतिम दि. ११/४/२०१७ सायं. ०७.०० वाजेपर्यंत राहील. ४) विजयी स्पर्धकांना प्रमाणपत्रासह बक्षिस देण्यात येतील. ५) स्पर्धेत भाग घेण्याऱ्या स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येतील. ६) बक्षिस वितरण कार्यक्रम दि. १४/०४/२०१७ रोजी सकाळी ११.०० वा. होईल. ७) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

### ❊ भिमबुध्द गीत गायनांचा कार्यक्रम ❊

दिनांक : १६/४/२०१७ वार रविवार वेळ : सायं. ७.०० वा.
आयु. वैशालीताई इंगळे, सदस्या न.पा. बुलडाणा यांचेकडून गीत गायन कार्यक्रमाचे आयोजन.

### ❊ आपले विनित ❊

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती तथा क्रिडा व सांस्कृतिक मंडळ बुलडाणा,**
**भिमाई उपासिका महिला मंडळ, व भिमपुत्र गृप बुलडाणा**

रेणुका, जयस्तंभ चौक, बुलडाणा. Mob: 9975119040 Sagar.161

# करीअरचा मनोरा बांधण्यासाठी सिव्हील इंजिनिअरिंग

प्रा. गणेश देशमुख, बुलडाणा, मो.९७३०८२२२३२

अभियांत्रिकी क्षेत्राची सुरवात ज्या शाखेपासून झाली ती म्हणजे स्थापत्य अभियांत्रिकी (Civil Engineering) अतिशय उत्कृष्ठ संधी या क्षेत्रातील पदवीधरांना उपलब्ध असतांना देखील जुने पुर्वग्रह, न्युनगंड व कमकुवत दुरदृष्टीकोन यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांनी या शाखेकडे पाठ फिरवली आहे. पण खरच तसे आहे का? याच विश्लेषण करणारा हा लेख.



अन्न, वस्त्र, निवारा ह्या माणसाच्या मुलभूत गरजा आहेत. त्यातील निवारा ह्याच्याशी थेट संबंध असणारी शाखा म्हणजे स्थापत्य अभियांत्रिकी. बांधकाम ही आजची मुलभूत गरज व अपरिहार्य अशी गोष्ट आहे. बांधकाम केल्याशिवाय जगातील कोणतीच गोष्ट किंवा प्रक्रिया ही पुढे जाऊ शकत नाही. त्यामुळे या शाखेतील संधी व वाव भविष्यात कधीच कमी होणार नाही अशी चिन्हे आहेत.

आपल्या दैनंदिन जीवनात घरे, रस्ते, पाण्याची टाकी, नाल्या, उड्डाण पुल, पाईपलाईन, धरण इत्यादी सर्व बाबी ह्या स्थापत्य अभियांत्रिकाशी जुडलेल्या आहेत. वरील सर्व गोष्टी अत्यावश्यक आहेत व दिवसेंदिवस जशी लोकसंख्या वाढत जाते त्याचे प्रमाणही वाढत जाते. त्यामुळे या क्षेत्रात करीयर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना मरण नाही हे निश्चीतच आहे. या व्यतिरिक्त ज्या बांधकामाला १०० वर्षे पुर्ण झालेली आहेत ती पाडून पुनर्बांधणीचा प्रकल्प मुंबई सारख्या शहरात भविष्यात राबविला जाणार आहे. त्या प्रकल्पात हजारो जुन्या इमारती पाडून नवीन इमारती बांधणार आहेत. ज्यामुळे स्थापत्य अभियंत्यांना खुप मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होणार आहे.

शासकिय नोकरी लागावी हे आजकालच्या विद्यार्थ्यांचे स्वप्नअसते. ते स्वप्नही स्थापत्य अभियांत्रिकीच्या माध्यमातून पूर्ण होत आहे. सर्व शासकीय कार्यालये उदा. पाटबंधारे विभाग, जीवन प्राधिकरण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरपालिका, जिल्हा परिषद, महावितरण, सिडको, वन विभाग, इत्यादी सर्व ठिकाणी दरवर्षी शेकडो स्थापत्य अभियंत्यासाठी सुवर्ण संधी उपलब्ध असतात. ही एकमेव अशी शाखा आहे. ज्या शाखेतून शासकीय नोकऱ्या जास्तीत जास्त उपलब्ध आहेत.

तसेच खाजगी क्षेत्रातही दिवसेंदिवस बांधकामाचे प्रमाण हे वाढत आहे. देशभरात हजारो लहान मोठ्या बांधकाम कंपन्या आहेत. त्यामध्ये L&T,Gammon India, Afcons, DLF, ROLTA, Hindustan Construction, Shobha Developres, KEC International, ACC Construction, Tatabluescope, Sterling अशा बऱ्याच मल्टीनॅशनल कंपनी आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना खाजगी क्षेत्रातही करीअर करण्यासाठी खूप वाव आहे.

या पलीकडे सांगायचे झाल्यास या क्षेत्रातील पदवीधर बांधकामाचा व्यवसाय आपल्या स्वतःच्या गावात सुरू करू शकतात त्यासाठी त्याना इ.ए (Civil) झाल्यानंतर एक लायसन्स मिळते. त्यावर ते स्वतःची Consultancy किंवा ठेकेदारी सुरू करू शकतात,व चांगल करिअर त्यात घडवू शकतात.

या व्यतिरिक्त शिक्षकी पेशाची आवड असल्यास हे पदवीधर तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रिकी किंवा I.T.I महाविद्यालयावर प्राध्यापक म्हणून लागू शकतात. या क्षेत्रातही दिवसेंदिवस मागणी खूप मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. बांधकामाचे प्रमाण हे संपूर्ण जगात खूप झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे भारताबाहेर जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना या शाखेत खूप वाव आहे. बांधकाम ही न थांबणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे या क्षेत्रातील संधीही ह्या न थांबणाऱ्या आहेत. इतर क्षेत्रातील पदवीधरांची वाढती संख्या व त्यांच्यातील जीवघेणी स्पर्धा बघता विद्यार्थ्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीचा पर्याय निवडून आपले करिअर घडवावे व समाजात ताठ मानाने जगण्याची संधी गमवू नये. विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी काही शंका असल्यास किंवा अधिक माहितीसाठीसंपर्क साधावा.

सकाळ TODAY



**मोताळा : मार्गदर्शन करताना प्रा. देशमुख व उपस्थित मान्यवर.**

# विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी ध्येय निश्चि करावे : प्रा.गणेश देशमुख

**मोताळा, ता. ६ :** जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी प्रथम ध्येय निश्चित करावे, तरच यशाच्या आकाशाला गवसणी घालणे शक्य आहे, असे प्रतिपादन प्रा. गणेश देशमुख यांनी शनिवारी केबीजे नॉलेज हब बोराखेडीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना केले.

कुसूमावती भीमराव जाधव नॉलेज हब बोराखेडी येथे सावित्री-जिजाऊ जन्मोत्सव निमित्त मिशन विजयस्तंभ अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. प्राचार्या डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यशाळेत मोटिव्हेटर प्रा. गणेश देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी स्पर्धात्मक परीक्षेकरिता अभ्यास व वेळेचे नियोजन कसे करावे, याबाबत सांगितले. तसेच सकारात्मक विचारांचा फायदा, जिद्द, मेहनत, चिकाटीतून ध्येय प्राप्तीचा मार्ग निघतो, असे मत व्यक्त केले. दरम्यान, बारावी नंतर उपलब्ध असणारे विविध कोर्सेस, शासकीय व खासगी क्षेत्रातील विविध संधी आदी बाबींवर प्रकाश टाकला. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. प्राचार्या डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी तत्पर राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन संतोष ढाले यांनी केले. यावेळी उपप्राचार्य एन.जी. नारखेडे, रविकिरण वानखेडे, प्रा. अनिल रिंढे यांच्यासह शिक्षक बांधव व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# अभ्यास कसा करावा

- विद्यार्थ्यांना चांगले करिअर करायचे असेल तर आपली अभ्यासातून सुटका नाही, हे सर्वप्रथम समजून घ्यावे.
- विद्यार्थ्यांनी जीवनातील ध्येय मोठे ठेवावे. त्यातून इच्छाशक्ती निर्माण होते. इच्छा शक्तीतून एकाग्रता वाढते, एकाग्रतेतून अभ्यास करण्याची क्षमता वाढते.
- वेळचे काम वेळेवर करणे हाच कमी त्रासात जास्त अभ्यास करण्याचा मार्ग आहे. तुमच्या जवळील संपूण वेळ वापरा.
- विद्यार्थ्यांनी सर्व विषय शाळेतच/महाविद्यापयातच शिक्षकांच्या तासिकेत लक्ष देऊन समजून घ्यावेत, म्हणजे घरी जास्त अभ्यास करावा लागत नाही.
- विद्यार्थ्यांनी एकूण उपलब्ध असलेला वेळ व एकूण करावयाचा अभ्यास याचे नियोजन करून ते काटेकोरपणे पालन करावे.
- शाळेच्या दिवशी कमीत-कमी सहा तास अभ्सा तर सुट्ट्यामध्ये कमीत कमी १५ तास अभ्यास दररोज करावा.
- अभ्यासाला बसल्यावर सलग तीन तास तरी अभ्यास करावा, मध्ये उठू नये.
- अभ्यासाची जागा शक्य असेल तर वारंवार बदलू नये.
- सकाळपासून रात्री झोपेपर्यंत प्रत्येक तासाचे नियोजन असावे. नियोजन शून्य जीवन विद्यार्थ्याने जगू नये.
- विद्यार्थ्यांनी झोप फक्त रात्री सात तास घ्यावी.
- स्वतःसला समजेल अशा भाषेमध्ये स्वतःच्या नोट्स काढाव्यात. ह्या नोट्स काढण्यासाठी तीन ते चार पुस्तकांचा प्रथम चांगला अभ्यास करावा.
- परीक्षेमध्ये हस्ताक्षर सुंदर काढावे, आकृत्या चांगल्या व मोठ्या काढाव्यात, खोडातोड टाळावी.
- सर्व विषयांची विभागणी दोन प्रकारात करावी. सोपे विषय आणि कठीण विषय, अशी विभागणी असावी.
- जे विषय तुम्हाला कठीण वाटतात त्यावर विशेष लक्ष देऊन त्याचा सराव करावा. सरावानेच कठीण विषय हे सोपे वाटतात. त्यांना जास्त वेळ द्यावा.
- स्वतः जवळील संपूर्ण वेळ व संपूर्ण ताकद अभ्यासात जर लावली तर परीक्षेत हमखास यश मिळतेच.
- अभ्यास जर चांगला झाला असेल तर परीक्षेची भिती मुळीच वाटत नाही. त्यामुळे अभ्यासाला खूप वेळ द्यावा.
- परीक्षेचा अभ्यास करताना त्या विषयाच्या कमीत कमी पाच मागील प्रश्नपत्रिका पाहाव्यात म्हणजे आपल्या अभ्यासाला योग्य दिशा मिळते.
- सरावाने आणि अभ्यासाने अतिशय साधारण विद्यार्थीसुद्धा परीक्षेत चांगले गुण मिळवू शकतो आणि जीवनात प्रगती करू शकतो.
- अभ्यास न करणाऱ्या व दिवसभर टाईमपास करणाऱ्या मित्रांपासून दूर रहा.
- डोळ्यासमोर कायम मोठे ध्येय असेल तरच विद्यार्थी यशस्वी होतात. मूळ उद्देशापासून कधीच भटकू नका. अभ्यासाशिवाय पर्याय नाही.
- संतुलीत आहार घ्या. तब्येतीची काळजी घ्या. वेळेचे नियोजन व्यवस्थित करा. अभ्यासाव्यतिरिक्त इतर सर्व विषय टाळा एकांतात रहा.
- आजच्या स्पर्धेच्या युगात एक जरी वर्ष वाया गेले तर तुमच्या क्षेत्रातील लाखो विद्यार्थी पुढे निघून जातात. त्यामुळे वेळेच माणसाच्या जीवनात अतिशय महत्त्व आहे, हे समजून घ्या.
- यशस्वी झालेले सिनियर मित्र यांच्या कायम संपर्कात रहा. त्यांचे मार्गदर्शन घ्या.
- स्वतःच्या जीवनातील समस्या (घरातील वाद, आर्थिक समस्या, आजारपण याचा आपल्या अभ्यासावर जास्त परिणाम होणार नाही, अशी मनःस्थिती बनवा.)
- चांगल्या शिक्षकांचा आदर करा आणि त्यांच्या अनुभवाचा फायदा करून घ्या.
- आई-वडील यांच्या आज्ञेचे पालक करा. ते तुमचे खरे शुभचिंतक आहे.
- परीक्षेत किंवा जीवनात कुठेही अपयश आले तर खचून जाऊ नका. अपयशाची खरी कारणं शोधा. पुन्हा नियोजन करा आणि पुन्हा जिद्दीने कामाला लागा.
- अभ्यासातून यश मिळाले तर तुमचा आत्मविश्वास खूप वाढतो व पुन्हा त्या आत्मविश्वासातून पुढचे यश प्राप्त होते. ही यशाची मालिका आजच सुरू करा.
- सर्व महत्त्वाचे सूत्र, आकृत्या, समिकरण याचा एक संच कायम तुमच्या जवळ ठेवा. तो आयुष्यभर कामात येतो.

प्रा. गणेश देशमुख
बुलडाणा

दि. १५ फेब्रुवारी १६

॥श्री॥

मा. प्रा. गणेश देशमुख

स. न.

आपण स्नेहपूर्वक पाठविलेला 'विचारधन' हा सुविचार संग्रह मिळाला. प्रथमत: धन्यवाद. आपण केलेलं संकलन विविधांगी आशय आणि चिंतनाच्या माध्यमातून अतिशय सकस तथा मार्मिक झालेलं आहे. यातील भाषिक वैभव-संपन्नता मनावर विराजमान होऊन आत्मिक सुखाच्या जाणिव-नेणीव सोबतच वर्तमान जगण्याचा परीपाठ मांडतं.

साहित्य सेवेमध्ये 'विचारधन' देवून आपण तरुण-प्रौढांना उत्क्रांतीचं दालन खुलं केलंय. मला तर वाटते- विचारांचा हा दीप वाचकांच्या हृदयस्पंदनावर प्रकाशमान झाल्यास आचार आणि विचारांमध्ये नक्कीच परिवर्तन होईल, एवढी ताकद या संकलनामध्ये आहे.

आपल्या अथक परिश्रमास अनेकानेक शुभेच्छा!

-आपला

[signature]

# जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

**खामगाव :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती व गो.से. महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा व राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिर आव्हान २०१७ च्या बुलडाणा जिल्हा चमुची निवड चाचणी गो.से. महाविद्यालय येथे संपन्न झाली.

या कार्यशाळेचे आयोजन जिल्हा समनव्यक प्रा.डॉ.दिपक नागरीक यांच्या नेतृत्यात करण्यात आली. उद्घाटन जिल्हा आपत्ती पवार, व्यवस्थापन अधिकारी संभाजीराव पवार यांचे हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ.धनंजय तळवणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेत आपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत येणाऱ्या



कार्यशाळेत माहिती देताना मान्यवर.

विविध विषयांवर संभाजीराव पवार, डॉ.गणेश देशमुख, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ.संजयराव पवार वैद्यकीय अधिकारी, एस.एस. पाटील केंद्र नायक होमगार्ड, प्रा.नितीन भुजबळ यांचे विविध सत्रात मार्गदर्शन लाभले. यावेळी कमांडर विजय बहादूर थापा यांच्या नेतृत्यात पूर परिस्थितीत नियंत्रण, आग नियंत्रण, दोरीच्या सहाय्यकाने विविध प्रात्यक्षिके आदी बाबींचे प्रशिक्षण देण्यात आले.

समारोपीय कार्यक्रमाला प्रा.डॉ.गणेश माल्टे, संचालक, विद्यार्थी कल्याण, कर्नल विरेंद्रसिंग, प्राचार्य डॉ.धनंजय तळवणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून दादासाहेब बोबडे उपस्थित होते. कार्यशाळा आयोजनामागचा हेतू कार्यशाळेत राबविण्यात आलेले उपक्रम व निवड चाचणीचे निकष इ. गोष्टींची माहिती रासेयो जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.दिपक नागरीक यांनी प्रास्ताविकात दिले. प्रा.डॉ.माल्टे यांनी स्वयंसेवकांना गाडगेबाबांच्या विचारावर आधारीत कार्य करण्याचे आवाहन केले. कर्नल विरेंद्रसिंह यांनी आपत्ती अंतर्गत येणाऱ्या विषयांवर आपले विचार मांडले.

(प्रतिनिधी)


Gaurav Bayskar
9834273564
प्रा. गणेश देशमुख सर
(B.E. (Civil) M.E. (Structure), AIME ,(LMISTE)
संपूर्ण भारतात मोटिवेशनल स्पीकर, लेखक, विद्यार्थी
प्रिय शिक्षक, विचारवंत म्हणुन सुप्रसिद्ध
सर आपण केलेल्या कामाला एस्पायर अकादमी
कडून मानाचा मुजरा. आपण करत असलेले काम लाखो
लोकांपर्यंत पोहचावे हीच अपेक्षा. ज्या प्रकारे 'विचारधन'
या पुस्तकला प्रतिसाद मिळाला. असाच प्रतिसाद येणाऱ्या
सर्व पुस्तकाला लाभो
हेच ईश्वर चरणी प्रार्थना करतो.
अभिनंदन सर
Aspire Academy
Amravati

# नंदनवन आश्रम शाळेत स्कूल बॅगचे वाटप




**पंकज लद्धड अभियांत्रिकी महाविद्यालचा उपक्रम**

◆ **बुलढाणा, १४ जुलै**

आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर पंकज लद्धड अभियांत्रिकी महाविद्यालच्या वतीने नंदनवन अनाथ आश्रमशाळा साखळी येथील ५२ मुलांना स्कूल बॅग वाटप केल्या.

यावेळी व्हिजन ग्रुप ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष, हृदयरोग तज्ञ डॉ. दीपक लद्धड यांच्या मार्गदर्शनात संस्थेचे संचालक रवींद्र लद्धड, अर्चना लद्धड, अभियांत्रिकेचे प्राचार्य डॉ. पी.एम. जावंधिया, लद्धड फार्मसी चे प्राचार्य डॉ. हेमंतकुमार धोंगडे, व्हिजन नर्सिंग स्कूल च्या प्राचार्या रिबेका, प्रा.गणेशराव देशमुख, प्रा.मंदार जोशी, प्रा.प्रवीण पऱ्हाड, प्रा.पराग जावळे, संजय खडसे यांची उपस्थिती होती. *(तभा वृत्तसेवा)*

दिनांक १५ सप्टेंबर २०१८, शनिवार

# जगाच्या जडणघडणीमध्ये अभियंत्याचे योगदान महत्वाचे

प्रा.गणेश देशमुख, मो.नं.9730822232



कोणत्याही देशाच्या प्रगतीमध्ये, जडणघडणीमध्ये सिंहाचा वाटा असतो तो तिथल्या अभियंत्याचा. कोणत्याही देशाचा अभियंता (इंजिनियर) म्हणजे जणू काही चारचाकी गाडीची चार चाकच. दैनंदिन जीवनात सकाळी उठल्यापासुन रात्री झोपेपर्यंत आजुबाजुला दिसणाऱ्या सर्व कलाकृती म्हणजे अभियंत्यांची देण आहे अस म्हणायला हरकत नाही. मानवी जीवन दिवसेंदिवस आनंदमय, सुखकर व्हाव यासाठी स्वतःच्या ज्ञानाने नवन-वीन साधनं उपलब्ध करुन देण हे खर अभियंत्यांच कर्तव्य. अभियंता म्हणजे वैज्ञानिक कलाकारच. जगभरातील सर्व क्षेत्रातील किचकट प्रक्रिया सोपे करुन देणाऱ्या अभियंत्यांचा आज ''अभियंता दिन'' आहे. २० वर्षापूर्वीची टेक्नोलॉजी आज संपुर्णपणे बदलली आहे. शासकीय कार्यालये, खाजगी कंपन्या, शेतीतील उपकरणे, वाहतुक व्यवस्था (रस्ता, पुल, रेल्वे, जहाज, विमान इत्यादी) शाळा, कॉलेजस, दवाखाने इत्यादी सर्व क्षेत्रातील त्रासदायक आणि वेळखाऊ प्रक्रीया आता अतिशय सुलभ आणि सोयीस्कर झाल्या आहेत याचे सर्व श्रेय जोत ते फक्त अभियंत्यांनाच. या व्यक्तीरिक्तही दैनंदिन वापरातील वस्तु टीव्ही, मोबाईल, कॉम्प्युटर, वाहने, कपडे इत्यादींमध्ये ही दिवसेंदिवस अमुलाग्र बदल होत आहे. आपल्या आजुबाजुच्या प्रत्येक गोष्टीचा अभियांत्रिकी क्षेत्राशी घनिष्ठ संबंध आहे. रस्ते, इलेक्ट्रीसिटी, घर, धरण, उड्डाणपुल, पाण्याची टाकी, दुचाकी सहित सर्व प्रकारची वाहने, टीव्ही, मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप इत्यादी सर्व निर्माण करणे, त्याची काळजी घेणे, अद्यावत ठेवणे ही सर्व अभियंत्याची कामे आहेत. आजपासुन ५० वर्षानंतर टेक्नोलॉजी ही संपुर्णपणे वेगळी आणि अतिशय सोयीस्कर होईल ती म्हणजे अभियंत्यांच्या कार्यामुळे आणि त्यांच्या संशोधनामुळे, २० वर्षाअगोदरचा टीव्ही, मोबाईल, कॉम्प्युटर कसा होता आणि कसा राहू शकतो यावरुन तो पुढील २० ते ३० वर्षानंतर कसा राहू शकतो याचा अंदाजही अतिशय सामान्य माणुस लावू शकतो. अभियंता म्हणजे देशाच्या विकासाचा कणा आहे. भारतात सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दरवर्षी १५ सप्टेंबर हा अभियंता दिन म्हणून साजरा करण्यात येतो. सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया (नाईट कमांडर ऑफ दी ऑर्डर ऑफ दि इंडीयन एंपायर, १५ सप्टेंबर १८६१- १४ एप्रिल १९६२) यांचा जन्म भारतातील कर्नाटक राज्यातील चिकबळ्ळापुर जिल्ह्यातील मुद्धेनहळळी या गावी झाला. सन १९५५ मध्ये त्यांना भारतरत्न हा भारतातील सर्वोच्च सन्मान मिळाला. म्हैसुरचे ते १९ वे दिवान होते. त्यांचे शिक्षण युनायटेड मिशन स्कुल बंगलोर, मद्रास विद्यापीठ, आणि स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे येथून झाले. संपूर्ण भारतात त्यांनी बांधकाम क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. म्हैसुरमधील कावेरी नदीवर बांधण्यात आलेल्या कृष्ण राजसागर धरण बांधकामाचे ते मुख्य अभियंता होते.

अभियंता हा प्रामुख्याने सिव्हील, मेकॅनीकल, इलेक्ट्रीकल, कॉम्प्युटर, इलेक्ट्रानिक्स अ‍ॅण्ड टेलीकम्युनिकेशन, आयटी, प्रॉडक्शन, केमीकल, एरॉनॉटीकल, फुड टेक्नॉलॉजी, इन्स्टुमेंटेशन, टेक्सटाईल, मायनिंग इत्यादी विषयांमधील पदवीधर असतो. सरकारी नोकरी, खाजगी कंपन्या, स्वतःचा व्यवसाय, शिक्षकीपेक्षा इत्यादी क्षेत्रातुन हा अभियंता विविध प्रकारची सेवा लोकांना पुरवत असतात. पण मागील ५ ते ६ वर्षांपासुन अभियंता आणि अभियांत्रिकी क्षेत्र याकडे बघण्याचा लोकांचा दृष्टीकोण बदलला आहे. अभियांत्रिकी शिक्षण घेऊन चांगले करीयर करता येत नाही असा गैरसमज सर्वत्र पसरत आहे. पण अजुनही चांगले हुशार विद्यार्थी १२ वी सायन्सनंतर अभियंता बनण्याच स्वप्न बाळ-गतात आणि जीवनात यशस्वीही होतात. शेवटी विद्यार्थी कोणत्या क्षेत्रात जाऊन स्वतः किती मेहनत करतो यावरच त्याच यश/अपयश अवलंबुन असते. अभियांत्रिकी महाविद्यालयचे झपाट्याने वाढली आणि अगदी सहज प्रवेश मिळतो म्हणुन हा कोर्स खराब झाला असा गैरसमज विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी करुन घेऊ नये. उलट बाकी सर्व कोर्सेसच्या तुलनेत (व्यवस्थीत तुलना केली तर) अभियांत्रिकी हाच कोर्स सर्वश्रेष्ठ ठरतो असे आजच्या अभियंता दिनी मी सांगु इच्छितो. सर्वांना अभियंता दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...



रामकृष्ण चॅरिटेबल ट्रस्ट, विवेकानंद नगर, बुलडाणा द्वारा संचालित

# नित्यानंद सेवा प्रकल्प

विवेकानंद नगर, हिवरा बु।।, ता. मेहकर, जि. बुलडाणा

रजि. क्र.: ई/८७४/बुलडाणा



अध्यक्ष : श्री. [illegible]

मो.: [illegible]

दिनांक :

## 🙏हार्दिक आभार 🙏

आदरणीय देशमुख सर,,,

सामाजिक उत्तरदायित्वाच्या स्वयंप्रेरणेने,,, आपण नित्यानंद परिवाराला भेट देऊन तात्काळ 15098(पंधरा हजार आठ्ठ्यानव )रुपयांचा किराणा भरून दिला व आपल्या कृतिशील संवेदनेचा परिचय करून दिला.

नियतीच्या क्रूर आघाताने जीवनी आलेल्या आंधाकाराने भयभीत झालेल्या पामरांच्या आयुष्यात,,, प्रकाश होऊन जगणाऱ्या,,, नित्यानंद च्या प्रदीप्त दिव्यातील तेलं होणं गरजेचं आहे ,,, हे उमजल्यानेच आपण ,,,,,, तात्काळ कृतिशील संवेदनांचा गहिवर प्रकट करत,,,, आपल्या परिसस्पर्शी सहवासाने आणि अनमोल मार्ग दर्शनाने,,, मुलांच्या मनात चैतन्याचं स्पूलिंग पेरत,,,, उत्साहाचे वातावरण निर्माण केले......

लोकसह भागातून चालविल्या जाणाऱ्या सामाजिक संस्थांना मदतीचा भक्कम आधार देतं ,,,,, संजीवनी सेवाभावी ट्रस्टच्या माध्यमातून ,,, समाजातील दानशूर देवदूतांच्या सहभागातून ही दातृत्व चळवळ पुढे नेत आहात...... निरपेक्ष व निर्मोही वृत्तीने आपल्या आर्थिक मदतीच्या सेवासमिधा ,,, ह्या सेवायज्ञात अर्पण करणाऱ्या ,,, संजीवनी ग्रुपच्या ,,, सर्व सदस्यांप्रति आम्ही हार्दिक कृतज्ञता प्रकट करतो 🙏🙏🙏🙏🙏🙏

जाणवया दुरबालांचे
दुःख आणि वेदना.......
तेवत्या राहो सदा
रंधातूंनी संवेदना..........
🙏🙏🙏🙏🙏

आपल्या सदैव दातृत्व छायेत मार्गक्रमण करणारा.....
आपलाच
नित्यानंद परिवार,,

# सुप्रसिद्ध प्रेरणादायी वक्ते, लेखक, शिक्षणतज्ज्ञ प्रा.गणेश देशमुख यांचा संपूर्ण महाराष्ट्रात गाजत असणारा

## पालकमंत्र

१) आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थी जेवढा शिक्षणाबाबत / करीयरबाबत गंभीर असणे आवश्यक आहे तेवढेच त्याचे आई/वडील/पालकही जागरुक असणे आवश्यक आहे.
२) आपल्या पाल्याच्या अभ्यासासाठी पोषक वातावरण तयार करणे जेणेकरुन त्याचा अभ्यास चांगला होईल हे सर्व पालकांचे प्रथम कर्तव्य आहे. ३) मुले घरात अभ्यास करत असताना आपल्यापासून त्यांच्या अभ्यासात काहीच अडथळा येणार नाही याची काळजी सतत पालकांनी घेत रहावी.
४) पालकांनी टी.व्ही., रेडीओ इत्यादी गोष्टींचा आपल्या पाल्यास त्रास होणार नाही अशा प्रकारे वापर करावा.
५) अभ्यासाच्या वेळेत घरातील कामे, शेतीची कामे, बाजार, किराणा इत्यादी कामे आपल्या पाल्याला सांगू नये.
६) आपल्या पाल्याला लग्नसमारंभ, वाढदिवस, इ. सार्वजनीक कार्यक्रमात खुपच आवश्यक असेल तरच न्यावे अन्यथा त्याला अभ्यास करु द्यावा.
७) पालकांनी शिक्षणाविषयी / करीयर विषयी कुठल्याच प्रकारच्या नकारात्मक गोष्टी आपल्या पाल्यासमोर करु नये. पालकांच्या बोलण्यातून पाल्याची अभ्यासात आवड निर्माण व्हायला हवी.
८) अभ्यास करुन कुठल्याच प्रकारचा फायदा नाही किंवा अभ्यास केला तरी चालतो आणि नाही केला तरी चालतो अशी भुमीका पालकांची कधीच नको. ९) पालकांनी आपल्या पाल्याला त्याच्या शाळेविषयी / कोचींग क्लासविषयी विचारपूस करत रहावी.
१०) पालकांनी १ किंवा २ महिन्यातुन एकदा वैयक्तीकरीत्या शाळा/कॉलेज/कोचींग क्लास येथे भेट द्यावी आणि तेथील शिक्षकांसोबत पाल्याच्या प्रगतीविषयी चर्चा करावी.
११) आपल्या पाल्याच्या तब्येतीची सतत काळजी घेत राहावी. त्याच्या जेवणाची,चहा/नाश्त्याची शक्य तितक्या चांगल्या प्रकारे काळजी घ्यावी.
१२) आपल्या पाल्याजवळील वाहन (सायकल, दुचाकी, इत्यादी) व्यवस्थीत कार्य करत आहे किंवा नाही हे तपासून पहावे.
१३) आपल्या पाल्याला आवश्यक असणारे सर्व शैक्षणीक साहित्य (पेन, पुस्तक, वही, इत्यादी) उपलब्ध करुन द्यावेत.
१४) पालकांनी शक्य असल्यास आपला पाल्य दररोज गृहपाठ/अभ्यास करतो का हे तपासावे.
१५) स्पर्धेच्या युगात आपल्या पाल्याचा कुठलाच शैक्षणीक निर्णय चुकणार नाही यासाठी सर्व पालकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे
१६) शैक्षणीक निर्णय म्हणजे शाळा/कॉलेज/कोचींग क्लास/शाखा निवडणे, इत्यादी सर्व निर्णय कोणत्याही विद्यार्थ्याचं आयुष्य घडवत असतात, हे सर्व निर्णय पालकांनी संपूर्ण माहिती काढून आणि आपल्या पाल्याला विश्वासात घेऊन घ्यावेत.
१७) बरेच पालक या निर्णय प्रक्रिये मध्ये सहभागी होत नाहीत. आजच्या जीवघेण्या स्पर्धेमध्ये पालकांचा या निर्णयामध्ये सहभाग असणे ही काळाची गरज आहे. कारण निर्णय चुकले की हुशारी आणि मेहनत दोन्ही वाया जाते आणि आयुष्यभर त्रास होतो.
१८) शैक्षणीक निर्णयक्षमता वाढवण्यासाठी पालकांनी त्यांच्या परिचयातील नामांकीत डॉक्टर, इंजिनीअर, प्रथम श्रेणी अधिकारी, शिक्षक यांच्या संपर्कात राहावे आणि त्यांचे मार्गदर्शन घेत राहावे.
१९) आपल्या शहरात जर काही करीयरसंबंधी/शिक्षणासंबंधी सेमिनार/ कार्यक्रम होत असतील तर त्याला सर्व पालकांनी आवर्जून उपस्थीत राहावे.
२०) पालकांनी बाजारपेठेत उपलब्ध असलेली करीयरविषयक / अभ्यासविषयक पुस्तकांचे वाचन करावे,त्यातुनही खुप ज्ञान मिळते.
२१) पुस्तकं आणि व्याख्यानं ही अनुभवी लोकांची असली तर शैक्षणीक निर्णय क्षमता वाढण्यास खुप मदत होते आणि निर्णय ही चुकत नाहीत.
२२) जर निर्णय प्रक्रियेमधे पालक सहभागी नाही झाले तर विद्यार्थी स्वतः निर्णय घेत राहतात आणि त्यांचा अनुभव कमी असल्यामुळे कदाचित ते चुकूही शकतात.
२३) आपल्या पाल्याच्या सर्वांगीण व्यक्तीमत्व विकासासाठी कोणत्या वयात कुठले निर्णय घ्यायचे याचाही पालक ढोबळमानाने आराखडा तयार करु शकतात.
२४) पालकांनी आपल्या पाल्याला मारुन झोडून अभ्यासाला बसवू नये. त्यापेक्षा त्याची अभ्यासात आवड निर्माण होईल अशा काही गोष्टी सांगून त्याला अभ्यासाला बसवावे.
२५) मुलांना खुप कडक शिस्तीत ठेऊ नये आणि त्यांचे अती लाडही करु नये. या दोन गोष्टींचा समतोल कायम पालकांनी जपत राहावा.
२६) स्पर्धेच्या आणि धावपळीच्या जीवनात पालक आणि पाल्य यांचा संवाद दिवसेंदिवस कमी होत आहे ही गोष्ट पाल्यांच्या प्रगतीमधे अडथळा ठरु शकते.
२७) पालकांनी आपल्या पाल्यासोबत मैत्रीपुर्ण संबंध ठेवल्यास परस्परांमधील संवाद वाढतो आणि ब-याच समस्या दूर होतात.
२८) पालक हे पाल्याचे पहिले शिक्षक आहेत. पालकांनी पाल्याला निटनेटकेपणा, बोलण्याची पद्धत, दैनंदिन व्यवहार शिकवावा.
२९) पालकांनी आपला रिकामा वेळ पाल्याच्या करीयरसाठी कसा वापरता येईल याचा विचार करावा.
३०) पालकांनी आपल्या रिकाम्या वेळेत आपल्या पाल्याची शैक्षणीक, सामाजीक, वैचारीक, सांस्कृतीक पातळी वाढेल असे उपक्रम राबवावेत. उदा. चांगले पुस्तक वाचून दाखवणे, एखादा नविन खेळ शिकवणे, अभ्यासातील कठीण गोष्टी सोप्या करुन सांगणे, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे, गृहपाठ/अभ्यास करुन घेणे इत्यादी.
३१) पालकांनी स्वतः एक आदर्श व्यक्ती म्हणून आपल्या पाल्यासमोर उभे राहणे आवश्यक आहे. तुमच्या व्यक्तीमत्वातून तुमच्या पाल्याला कायम प्रेरणा मिळत राहाणे आवश्यक आहे.



- शिक्षण - B.E., M.E., AMIE , LMISTE
- सकाळ वृत्तपत्रातून लाखो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन
- भारतातील सर्वात मोठा सुविचार संग्रह 'विचारधन' (३००० प्रेरणादायी सुविचार) चे लेखक

- पंकज लद्धड अभियांत्रिकी महाविद्यालय बुलडाणा येथे मागील १० वर्षात १३ विषय शिकवण्याचा आणि १०० कार्यक्रमांचा अनुभव
- मुंबई, पुणे, नाशिक, नागपुर, अमरावती, औरंगाबाद, अहमदनगर इत्यादी शहरांमधे व्याख्यानाव्दारे लाखो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा याचे सखोल मार्गदर्शन पाहिजे असल्यास खालील व्हॉट्सअॅप नंबर वर संपर्क साधावा.
Mob. No. 9730822232 www.ganeshdeshmukh.in

विदर्भ सिटिझन

मंगळवार, दिनांक ८ जून २०२१

४

# शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने दिव्य प्रकल्पाचे आ.गायकवाड यांच्या हस्ते उदघाटन

## दिव्यांग, मनोरुग्ण आणि बेघरांच्या हक्काच्या घराचे दरवाजे खुले



बुलडाणाः दिव्यांग, अनाथ, बेघर, बेसहारा यांच्यासाठी कायमचा निवारा उपलब्ध व्हावा यासाठी दिव्या फाऊंडेशनच्या माध्यमातून लोकसहभागातून दिव्या प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाले असून, शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून मतदार संघाचे आमदार संजय गायकवाड यांच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले , यावेळी प्रकल्पावर छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, तर आज पासून बेघरांसाठी त्यांच्या हक्काच्या घराचे दरवाजे आजपासून खुले झाले आहेत.

